| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ५६ वा | गुरूवार, दिनांक १४ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे






# मुख्यमंत्री 'बुलेट'वरून विधानभवनात!

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या ताफ्यातील गाड्या कमी करत इंधन बचतीच्या केलेल्या आवाहनाला कृतीतून संदेश दिल्यानंतर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आज एक आगळावेगळा आदर्श समोर ठेवला. फडणवीसांनी नेहमीचा मोठ्या गाड्यांचा ताफा आणि कडक सुरक्षा व्यवस्था बाजूला सारून मुख्यमंत्री आज चक्क बुलेट मोटारसायकलवरून विधानभवनात दाखल झाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः बुलेट चालवत होते. तर त्यांच्या पाठीमागच्या सीटवर भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार स्वार झाले होते. पंतप्रधानांनी देशातील वाढता इंधन वापर कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी नागरिकांना शक्य तिथे इंधनाची बचत करण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत प्रशासकीय स्तरावर आणि सर्वसामान्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आज स्वतः दुचाकी चालवून विधानभवन गाठण्याचा निर्णय घेतला.

# विधान परिषदेच्या नवनिर्वाचित १० आमदारांनी घेतली सदस्यत्वाची शपथ



**मुंबई/प्रतिनिधी :** विधान परिषदेवर विधानसभा सदस्यांद्वारे द्विवार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या नऊ सदस्य आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या प्रज्ञा सातव अशा १० नवनिर्वाचित सदस्यांचा विधानभवनात आज शपथविधी सोहळा पार पडला. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे विधान परिषदेच्या या नवनिर्वाचित सदस्यांना सदस्यत्वाची शपथ दिली.

भाजपचे प्रमोद जठार, सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रज्ञा सातव, शिवसेनेच्या (शिंदे) डॉ. नीलम गोऱ्हे व बच्चू कडू, शिवसेना (ठाकरे) गटाचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राष्ट्रवादीचे झिशान सिद्दिकी यांनी विधान परिषदेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार देखील उपस्थित होते.

१० जागांसाठी १० उमेदवारांनीच अर्ज दाखल केल्यामुळे निवडणूक बिनविरोध- महाराष्ट्र विधान परिषदेच्या १० जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली होती. विधान परिषदेच्या ९ जागांसाठी नियमित निवडणूक तर एका जागेची पोटनिवडणूक पार पडणार होती. १२ मे २०२६ रोजी विधान परिषदेच्या या १० जागांसाठी निवडणूक होणार होती. परंतु १० जागांसाठी १० उमेदवारांनीच अर्ज दाखल केल्यामुळे महाराष्ट्रातील विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध झाली. यामध्ये भाजपच्या ६, शिवसेना शिंदे गटाच्या २, राष्ट्रवादी अजित पवार गटाचा १ आणि शिवसेना ठाकरे गट (महाविकास आघाडी) च्या एका उमेदवाराचा समावेश आहे.

**कोणत्या पक्षाकडून कुणी शपथ घेतली?**

- प्रमोद जठार- भाजप
- सुनील कर्जतकर- भाजप
- माधवी नाईक- भाजप
- संजय भेंडे- भाजप
- विवेक कोल्हे- भाजप
- प्रज्ञा सातव- भाजप
- डॉ. नीलम गोऱ्हे- शिवसेना शिंदे गट
- बच्चू कडू- शिवसेना शिंदे गट
- झिशान सिद्दिकी- राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट
- अंबादास दानवे- शिवसेना ठाकरे गट (महाविकास आघाडी)

# केरळच्या मुख्यमंत्रीपदी काँग्रेसकडून व्ही. डी. सतीशन यांच्या नावाची घोषणा!



**नवि दिल्ली/वृत्तसंस्था:** गेल्या १० दिवसांपासून केरळमध्ये ज्या प्रश्नाची जोरदार चर्चा होती, त्याचं उत्तर अखेर काँग्रेसप्रणीत यूडीएफ अर्थात युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटने शोधलं आहे. काँग्रेसचे सरचिटणीस आणि लोकसभा खासदार के. सी. वेणूगोपाल व रमेश चेन्नीथला यांच्याशी सतीशन यांची थेट स्पर्धा होती. केरळ काँग्रेसबरोबरच दिल्ली काँग्रेसमधील नेतेमंडळींमध्येदेखील या तिघांबाबत एकमत होऊ शकत नव्हतं. अखेर चर्चेच्या अनेक फेऱ्या आणि राज्यातील दिग्गज नेत्यांसोबत झालेल्या बैठकांनंतर काँग्रेस नेतृत्वानं व्ही. डी. सतीशन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं आहे. त्यामुळे केरळचे नवे मुख्यमंत्री म्हणून सतीशन यांचा शपथविधी होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

४ मे रोजी तमिळनाडू, आसाम, पश्चिम बंगाल, पुदुच्चेरी या चार राज्यांसह केरळचेदेखील निकाल जाहीर झाले. केरळमधील डाव्याच्या आघाडीचा पराभव करत काँग्रेसप्रणीत यूडीएफनं बहुमत मिळवलं. मात्र, राज्याचं नेतृत्व नेमकं कोण करणार? याबाबत केरळमध्ये तिढा निर्माण झाला. काँग्रेसमदून काही दिग्गज नेत्यांची नावं चर्चेत आली. त्यापैकी व्ही. डी. सतीशन यांच्यासोबतच रमेश चेन्नीथला व केंद्रात गेल्या काही वर्षांपासून कार्यरत असणारे काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी के. सी. वेणुगोपाल यांचं नाव स्पर्धेत होते.

# नीट पेपरफुटी प्रकरणी केंद्र सरकारचा काँग्रेसने केला तीव्र निषेध

## दोन दिवसांत एनएसयूआय व युवक काँग्रेस रस्त्यावर उतरुन केंद्र सरकारचा निषेध नोंदवणार




**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या मूळे नीट परीक्षा रद्द झाल्याने लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात पडले असल्याचा आरोप करत लातूर जिल्हा काँग्रेसने केंद्र सरकारचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. विद्यार्थी व पालकांना मानसिक, आर्थिक आणि वेळेच्या मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागणार असल्याने काँग्रेस पक्ष विद्यार्थी-पालकांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार असल्याची घोषणा जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी केली.

लातूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत अभय साळुंखे म्हणाले, दरवर्षी नीट परीक्षेचा पेपर फुटतो, तरीही केंद्र सरकार कोणतीही ठोस कारवाई करत नाही. यामुळे सरकार दिवसेंदिवस कुचकामी ठरत आहे. पालक आपल्या पाल्याच्या भविष्यासाठी दोन वर्ष वैयक्तिक आयुष्याकडे दुर्लक्ष करून लाखो रुपये खर्च करतात. मात्र सरकारच्या दुर्लक्षपना मूळे परीक्षा रद्द होण्याची नामुष्की आली आहे. काँग्रेस पक्ष या सर्व विद्यार्थी व पालकांच्या पाठीमागे उभा आहे.

पुढील दोन दिवसांत एनएसयूआय व युवक काँग्रेस रस्त्यावर उतरून केंद्र सरकारचा निषेध नोंदवणार असल्याची माहिती देण्यात आली. काँग्रेस पक्षाने बेजबाबदार सरकारविरोधात जनतेने असहकार आंदोलन उभे करण्याचे आव्हानही दिले आहे.

असे आवाहन काँग्रेस पक्षातर्फे करण्यात आले आहे. साळुंखे म्हणाले, आम्ही सर्व संस्थाचालक व शिकवणी चालकांना प्रत्यक्ष भेटून विनंती करणार आहोत. पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडू नये यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण द्यावे. लातूर एज्युकेशन हब असल्याने संस्थाचालक नेहमीच विद्यार्थ्यांच्या मदतीला पुढे सरसावतात, त्यामुळे ते यावेळीही मदत करतील अशी आम्हाला आशा आहे.

यात्रसंगी लातूर शहर काँग्रेस अध्यक्ष ॲड. किरण जाधव म्हणाले, लातूर शहर ही शिक्षणाची राजधानी आहे. शिक्षण क्षेत्राने शहराच्या जडणघडणीमध्ये मोठे योगदान दिले आहे. नीट परीक्षा रद्द झाल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीत सर्व शैक्षणिक संस्था व खाजगी शिकवणी चालकांनी विद्यार्थ्यांना पूर्ण मदत करावी. ते निश्चित मदत करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या महिन्यात झालेल्या नीट परिक्षेच्या वेळी काँग्रेसने नीट परिक्षा देणाऱ्या पाल्यांसाठी बसण्याची व पिण्याच्या पाण्याची सोय केली होती. त्याच धर्तीवर आता शुल्कमाफीसाठी प्रयत्न करण्यात येईल. पत्रकार परिषदेत परिवहन सभापती फैसल कायमखानी, माजी उपमहापौर कैलास कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, मनपा गटनेते विजयकुमार साबदे, मतीन सय्यद, शरद देशमुख आदी उपस्थित होते.

रोज वाचा ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

## प्रभात किरणे

जगायचं शंभर वर्ष,तर रहावे निरोगी
आपल्याच तर हाती,राहणे,बिनरोगी
दिनचर्या रोज,चालणे,फिरणे,खाणे
तासभर व्यायाम,प्राणायम,योगा करणे
- इंजि. नागनाथ कलवले, लातूर
+९१ ९७६४७ ८८२८८

# लातूरच्या एमआयडीसीतील कारखान्यास आग: साडेतीन वर्षांमधील ३१ वी घटना

**लातूर/प्रतिनिधी:** शहरालगतच्या एमआयडीसी परिसरातील मे. सुजाता इंडस्ट्रीजला मंगळवारी (१२ मे) रात्री भीषण आग लागली. फटाक्याच्या एका ठिणगीमुळे लागलेल्या या आगीत कंपनीतील सुमारे २० ते २२ लाख रुपयांचे साहित्य जळून खाक झाले आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने धाव घेत शर्थीचे प्रयत्न केल्याने एका तासात आगीवर नियंत्रण मिळवता आले. यामुळे आजूबाजूच्या उद्योगांचा मोठा धोका टळला. दरम्यान, लातूर एमआयडीसीमध्ये मागील साडेतीन वर्षांत आगीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, ही तब्बल ३१ वी घटना आहे.

एमआयडीसीतील ए-१५ प्लॉट येथे चेतन बोथरा यांच्या मालकीची 'मे. सुजाता इंडस्ट्रीज' ही कंपनी आहे. या कंपनीत पट्टे, रद्दी आणि 'एमएस स्क्रॅप' मोठ्या प्रमाणात होते. मंगळवारी रात्री ९:५९ च्या सुमारास फटाक्याच्या ठिणगीमुळे ही आग लागल्याचे बोथरा यांनी सांगितले. आगीची माहिती मिळताच लातूर महानगरपालिका अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. वाढत्या तापमानामुळे विद्युत उपकरणांमध्ये शॉर्ट सर्किट होऊन आगीच्या घटना वाढत असल्याचे अग्निशमन अधिकाऱ्यांनी सांगितले. उद्योगांमधील अग्निशमन यंत्रणा मोठ्या आगीला आटोक्यात आणू शकत नाही. त्यामुळे आगीच्या घटना टाळण्यासाठी दर्जेदार विद्युत उपकरणे वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, एमआयडीसी परिसरात काही काळ भीतीचे वातावरण होते. लक्ष्मीकांत कर्वा, उद्योजक तथा अध्यक्ष (लघु उद्योग भारती, लातूर) अग्निशमन अधिकारी बापूसाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली धनराज कांदे, ओंकार मानकर, शरद माने, निलेश बुरपुले (प्र. यंत्रचालक), पंकज गायकवाड, हसन शेख आणि मुकुंदा देशमुख या पथकाने धाव घेतली. एमआयडीसी परिसरात मागील महिनाभरात उद्योगाला लागलेली ही दुसरी मोठी आग आहे. यापूर्वी १६ एप्रिल २०२६ रोजी बॉयलरचा अचानक स्फोट होऊन भीषण आग लागली होती. या दुर्घटनेत एकाचा जीव गेला होता. प्रत्येक उद्योजकाने शासनाने अनिवार्य केलेल्या आग प्रतिबंधक योजनांचा प्रभावी वापर करावा. सर्वांनी उद्योगातील इलेक्ट्रिक कनेक्शन वर्षातून एकदा तपासावे. तसेच वर्षातून एकदा उद्योगस्थळी 'मॉक ड्रिल' घ्यावे, जेणेकरून सज्ज राहता येईल.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



सोयाबीनला रु.५७०८/-, कापसाला रु.८२६७/- हमीभाव...

## चिमटा दयाचा



लातूरच्या एमआयडीसी परिसरात आगीच्या घटना वाढल्या आहेत!
या भागात पुर्वखबरदारीचे प्रशिक्षणाची गरज आहे!!

# रुग्णसेवेतील योगदानाबद्दल परिचारिकांचा सन्मान

## विलासराव देशमुख शासकीय नर्सिंग महाविद्यालयात शपथग्रहण




**लातूर/प्रतिनिधी:** इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) लातूर शाखेच्या वतीने येथील विलासराव देशमुख शासकीय नर्सिंग महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी परिचारिकांच्या रुग्णसेवेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमास विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे उपअधिष्ठाता डॉ. मंगेश सेलुकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरूड, आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, खजिनदार डॉ. मन्सूर भोसगे, आयएमए वुमन्स विंगच्या अध्यक्षा डॉ. श्वेता काटकर, आदींची प्रमुख उपस्थिती होती. यात्रसंगी सर्व नर्सिंग विद्यार्थ्यांनी शपथ घेऊन सेवाभाव, समर्पण आणि रुग्णसेवेची बांधिलकी व्यक्त केली. विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली. तसेच, प्राचार्य उपस्थित होते.

वैद्यकीय क्षेत्रात परिचारिकांचा वाटा अत्यंत मोलाचा परिचारिका दिनाच्या निमित्ताने विलासराव देशमुख शासकीय नर्सिंग महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे रुग्णसेवेची, सेवाभावाची आणि समर्पणाची शपथ घेतली. वैद्यकीय क्षेत्रात परिचारिकांचा वाटा अत्यंत मोलाचा असतो. आरोग्य व्यवस्थेतील नर्सेसच्या याच महत्त्वपूर्ण भूमिकेचा मान्यवरांनी आवर्जून गौरव केला. तसेच, विविध स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करून त्यांचा उत्साह वाढवण्यात आला. रुग्णसेवेत स्वतःला झोकून देणाऱ्या परिचारिकांच्या या निःस्वार्थी बांधिलकीचे आयएमएच्या वतीने विशेष कौतुक करत कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# १४ तोळे सोन्यासह ५० तोळे चांदीवर चोरट्यांचा डल्ला

**लातूर/प्रतिनिधी:** घरात कोणीही नसल्याचा डाव साधून अज्ञात चोरट्याने कपाटाचे लॉक तोडून आतील १४ तोळे एक ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व ५० तोळे चांदीच्या दागिने चोरल्याची घटना शहराच्या अनसार नगर येथील ताजोद्दीन बाबा दर्गा रस्त्यावरील घरात सोमवारी (दि.११) रात्री ८.३० ते १२. ३० वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी महमद पाशामियाँ शेख हे गुत्तेदार आहेत. सोमवारी रात्री साडे आठ ते मध्यरात्री साडे बारा वाजेपर्यंत कार्यक्रमानिमित्त ते घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. हाच डाव साधून अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश केला. लोखंडी कपाटाचे लॉकर तोडले. कपाटातील २ ग्रॅम सोन्याची अंगठी, ५.२०

ग्रॅमची अंगठी, ६.३ ग्रॅमची अंगठी, दोन तोळ्याची एक अंगठी, एक तोळ्याची एक अंगठी, दोन तोळ्याच्या दोन अंगठ्या, तीन ग्रॅमची अंगठी, एक तोळ्याची अंगठी, पाच ग्रॅमचे सोन्याचे रिंग, अडीच तोळ्यांचे सोन्याचे लॉकेट, ४ तोळ्यांचे गंठण, सव्वा ग्रॅमचे सोन्याचे पान, टॉप्स अडीच ग्रॅम असा एकूण १४ तोळे एक ग्रॅम सोन्याचे दागिने व ५० तोळे चांदीचे दागिने अज्ञात चोरट्यांनी पळवून नेले आहेत.

याप्रकरणी मंगळवारी (दि.१२) मध्यरात्रीनंतर विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुरनं. ३४०/२६ कलम ३३१ (४), ३०५ भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक वसंत मुळे करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## कठोर अमलबजावणींचा परिणाम होणार

छत्रपती संभाजीनगर येथे गैरप्रकार करणाऱ्या एका संशयित महिलेस आश्रय दिल्याने एका नगरसेवकाच्या घरावर बुलडोझर चालविण्याने आता कोठे गैर काम करणाऱ्यांत दहशद, भिती निर्माण होणार आहे. मुळात कोण काय करते, शासन किंवा सरकार ही धाडसी निर्णय घेत नाही असा समज होता. मुळात भितीच उरली नव्हती. कायद्याची भिती ठराविकांच्यामनात आहे बाकीचे भिती खिशात असल्याचे मत व्यक्त करतात. काय होतंय अशाच तोऱ्यात वावरणारी मंडळी अधिक दिसून येत आहे. संकट आले की, आपली घटना आठवते, संविधान आठवते, ज्यावेळी देश विरोधी काम करता, चुकीचे काम करता त्यावेळी आठवत नाही ही मोठे दुर्दैव भारताचे आहे. चुकीच्या मार्गाने चालणारी मंडळी अधिक दिसून येते. वास्तविक देशात राहाणारे सर्वजनच देशप्रेमी आहेत. मग कोणत्याही जाती-धर्माचा असो. तरीही भारतात विशेष करून महाराष्ट्रात ठराविक मोठ्या शहरात अप्रिय घटना घडत आहेत. नाशीक मधील घटना म्हणावी तेवढी सरळ नाही, मोठे षडयंत्र चालू होते. केवळ पोलिस यंत्रणेंनी चातुर्य दाखविले, या बाबत सखोल माहिती घेतली तर लक्षात येते. या बाबत मोठे परिश्रम घेतल्याचे कळून येते. छत्रपती संभाजीनगरमध्ये चुकीचा मार्ग आवलंबला गेल्याचा परिणाम नगरसेवकांचे घर व कार्यालयावर बुलडोझर चालवावे लागले. याचा परिणाम राज्यात मोठ्या प्रमाणात होणार आहे. आता चुकीच्या मार्गाने कोणी अयोग्य व्यक्तीस थारा दिला तर घरावर बुलडोझर फिरणार आहे याची आठवण राहाणार आहे. अशी भावना प्रत्येकाच्या मनात घर करून राहाणार आहे. वास्तविक देशविरोधी काम करणारे सर्वच किंवा मोठ्या संख्येने आहेत असे नाही. ठराविक बोटावर मोजण्याइतके, इतरांचे चुकीच्या व्यक्तीचे पाठबळ असल्याने, प्रोहत्सान मिळत असल्याने गैरप्रकाराला साथ मिळत आहे. एक तर कमजोर यंत्रणा आहे. तीचा लाभ घेतला जात आहे. काय होतंय असेच म्हणणाऱ्यांचे आता डोळे उघडले असणार! अति झाल्यास माती होते हे लक्षात आले असेल. त्यामुळे राज्यात अशीच यंत्रणा राबविली पाहिजे. समाजात आता एकाचे घर बुलडोझर लावुन पाडले असले तरी त्याला मदत करणारे कमी नाहीत. त्याला नवीन आलिशान घर बांधुन देणारे सापडतील, जे मदत करतील त्यांच्यावरसुद्ध कारवाई झाली पाहिजे. आता तर चुकीची मंडळी पेटून उठणार आहे. बघू कसे घर पाडता म्हणून चवताळतील, त्यांना कसे रोखणार? समाजात सर्वच चुकीची मंडळी आहे असे नाही अनेक चांगली मंडळी आहे. देशावर प्रेम करणारी आहेत. दुरदृष्टीचे आहेत. मुळात काहींना धर्माच्या आडून धार्मिक शिक्षणातून डोके भडकाविण्याचे काम होत आहे त्याला पायबंद घातला पाहिजे. जे शेतात पेरले जाईल तेच उगविणार आहे. वाईट पेरणी होत असेल तर चांगली व्यक्तीची निर्मिती कोठून होणार? त्यामुळे चुकीला माफी नसावी. त्याच प्रमाणे उत्तरप्रदेशात हा पॅटर्न राबविला गेला. त्यामुळे चुकीची मंडळीस आळा बसला आहे. त्याच प्रमाणे त्याच समाजातील इतर व्यक्तीला त्रास सहन करावा लागतो आहे. मुळात भारतात राहात असताना इतर जसे गुण्यागोविंदाने राहातात तसे त्या समाजाने राहीले पाहिजे. भारतात सर्व काही जनमतावर होते. जनसंख्येनुसार चालते. हेच ओळखुन काहींचा चुकीचा विचार मनात घोळत आहे. वास्तविक चुकीच्या किंवा देशविरोधी काम करणाऱ्यांना आश्रय देण्यापेक्षा माफीचा साक्षीदार बनविले पाहिजे. वास्तविक आपल्या राज्यात चुकीची मंडळीचा विस्तार मोठा आहे. ते लोकशाहीमार्गाचा आवलंब करून शिरकाव करीत आहे हे इतरांनी म्हणजे विरोध करणाऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. नगरसेवक, आमदार आदि निवडूण आलेले असतात. जनतेनी निवडलेले लोकप्रतिनिधी असतात. योग्य व्यक्ती निवडला गेला तर चांगले होते हे पहिल्यांदा लक्षात घेतले पाहिजे. उत्तरप्रदेशात चुकीच्या मार्गाने कारवाई होत नाही. चुकीचे काम करणाऱ्याविरोधात कायदे करणारे कोण असते तर सरकार असते. त्यामुळे सरकार मतासाठी काही कटू निर्णय घेत नाही. देश खड्डयात गेले तरी चालेले ही काहींची मानसिकता आहे ही योग्य नाही. प. बंगालमध्ये चुकीचे व्यक्ती, एक तर बांगलादेशात जातील किंवा इतर राज्यात जाण्याच्या विचार करतील. उत्तरप्रदेशात योगीबाबाने चुकीच्या व्यक्तीला धडा शिकविला आहे. चांगल्या किंवा नियमाने चालणाऱ्यावर कधीही शिक्षा दिली गेली नाही. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरात जे घडले ते त्याचे समर्थन केले पाहिजे. त्यामुळे एकतर चुकीचा किंवा गैरमार्ग कोणी आवलंबणार नाही. त्या समाजातील इतरांनांही त्रास होणार नाही. हे लक्षात घेतले पाहिजे. गुन्हा केला नसेल तर तोंड लपवुन, घाबरून पळून लपण्याची गरज नाही. अयोग्य केले नाही तर चौकशी दरम्यान समोर येवून निर्दोष सोडले जावू शकते. चुकीचे त्यापेक्षा देशविरोधी केले तर एक ना एक दिवस शिक्षेस तयार असले पाहिजे. छत्रपती संभाजीनगरमधील घटनेचे स्वागत केले पाहिजे. जे घडले ते लपून नाही तर जग जाहीर होते. असे जरी असले तरी काहींच्या प्रतिक्रिया या देशविरोधी दिसून येत आहेत त्या योग्य नाहीत. त्याचे घर पाडले म्हणजे तो निराधार होईल असे नाही. मात्र त्याला आलिशान घर देवूत असे म्हणणे चुकीचे आहे. त्याचे कार्य अयोग्य होते. वास्तविक त्यांने चुकीच्या लपविलेल्या व्यक्तीला शासनाकडे सोपविले पाहिजे होते. राज्यात छत्रपती संभाजीनगरचा पॅटर्न राज्यभर कडकपने राबविला तर निश्चित चुकीच्या बाबी घडणार नाही. आज जे चुकीचे घडत आहे. त्याला आळा बसणार आहे. आलिकडे काय होते. चुकीचे काही केले तर पकडले जाते. जेलमध्ये डांबले जाते. कधी तरी जामीन होईल या आशेवर जेलमध्ये निवांत दिवस काढत असतात. काही तरी शिक्षा दिली पाहिजे. चुकीच्या शिक्षेला माफी नाही हे कळाले पाहिजे. तरच गैरकाम कोणी करणार नाही. पुर्वी पुरूष मंडळी देशविरोधी, चुकीचे काम करीत होती आता त्या समाजाच्या महिलांसुद्धा दिसून येत असल्याबाबत आपला देश,राज्य किती पोखरला गेला आहे हे लक्षात येते. जे चुकीचे आहे, याला शिक्षा झाली पाहिजे, चुकीच्या बाबीचे कोणीही समर्थन करू नये, तरच देशात सुख, समाधान व आनंदी सर्वजनच राहातील. अयोग्य बाबीचे समर्थन काही कामाचे नाही हे सतत लक्षात ठेवले पाहिजे.

# छत्रपती संभाजी महाराज : पराक्रमाचे तेजस्वी प्रतीक

मराठ्यांच्या इतिहासात शौर्य, पराक्रम, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेची असंख्य तेजस्वी उदाहरणे आढळतात. या परंपरेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून भारतीय इतिहासात अभूतपूर्व कार्य केले. मात्र या स्वराज्याचे रक्षण करताना आपल्या प्राणांची आहुती देणारे, संकटांना न डगमगता सामोरे जाणारे आणि मृत्यूला देखील हसत स्वीकारणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होय. १४ मे हा दिवस छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका राजाचा जन्मदिन नसून स्वाभिमान, विद्वत्ता आणि अपराजित धैर्य यांच्या स्मरणाचा दिवस आहे.

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. त्यांचे बालपण हे अत्यंत संघर्षमय आणि आव्हानात्मक परिस्थितीत गेले. त्यांचे वडील छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य उभारणीच्या कार्यात सतत व्यस्त होते, तर माता सईबाईंचे निधन संभाजी महाराज लहान असतानाच झाले. त्यामुळे त्यांचे संगोपन जिजाऊ मातांच्या संस्कारांत झाले. जिजाऊंच्या सान्निध्यात त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम, शौर्य आणि न्यायप्रियता यांचे संस्कार रुजले. बालपणापासूनच संभाजी महाराज अत्यंत बुद्धिमान, पराक्रमी आणि अभ्यासू होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. संस्कृत, फारसी, मराठी, हिंदी आणि पोर्तुगीज भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी अल्पवयातच 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ लिहिला. यावरून त्यांच्या विद्वत्तेची कल्पना येते.

संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व केवळ योद्ध्याचे नव्हते, तर ते एक कुशल प्रशासक, अभ्यासू साहित्यिक आणि दूरदृष्टी असलेले राजकारणी होते. त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग हे संघर्ष आणि कटकारस्थानांनी भरलेले होते. आग्रा येथे औरंगजेबाच्या कैदेतून सुटका करताना त्यांनी दाखवलेले धैर्य उल्लेखनीय होते. शिवाजी महाराजांसोबत त्यांनी संकटांना सामोरे जात स्वराज्याचे धडे घेतले. बालवयातच त्यांनी युद्धकला, राजकारण आणि प्रशासन यांचे शिक्षण घेतले. त्यामुळे पुढे राज्यकारभार सांभाळताना त्यांना अनेक अनुभवांचा उपयोग झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यावर मोठे संकट आले. अंतर्गत राजकीय मतभेद आणि बाह्य शत्रूंचे आक्रमण अशा कठीण परिस्थितीत संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा सांभाळली. १६८१ मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला आणि त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्यांच्या कारकिर्दीचा काळ हा अत्यंत संघर्षमय होता. मुघल सम्राट औरंगजेबाने दक्षिणेत उतरून मराठ्यांचे राज्य संपविण्याचा निर्धार केला होता. त्याच वेळी सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्याशीही संघर्ष सुरू होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी धैर्याने आणि चातुर्याने शत्रूंना तोंड दिले.

संभाजी महाराज हे अत्यंत पराक्रमी सेनानी होते. त्यांनी अनेक युद्धांमध्ये आपल्या नेतृत्वाचे दर्शन घडवले. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने मुघलांना वारंवार पराभूत केले. औरंगजेबासारख्या बलाढ्य सम्राटालाही संभाजी महाराजांचे सामर्थ्य जाणवले होते. त्यांनी आपल्या सैन्याला प्रेरणा देत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांच्या युद्धनीतीमध्ये वेग, गनिमी कावा आणि अचूक नियोजन यांना विशेष महत्त्व होते. मराठा सैन्याची ताकद वाढविण्यासाठी त्यांनी अनेक उपाययोजना केल्या.

१६८९ मध्ये संगमेश्वर येथे आपल्यातीलच काहींच्या फितुरीमुळे संभाजी महाराज आणि कवी कलश मुघलांच्या ताब्यात गेले. औरंगजेबाने त्यांना अमानुष छळ दिला. त्यांच्या डोळ्यांसमोर अत्याचार करण्यात आले, शरीराचे हाल करण्यात आले, तरीही त्यांनी स्वाभिमान सोडला नाही. अखेर ११ मार्च १६८९ रोजी त्यांची क्रूर हत्या करण्यात आली. मात्र त्यांच्या बलिदानामुळे मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि स्वराज्य अधिक बळकट झाले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे महत्त्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. त्यांनी दिलेला संदेश संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. संकटे कितीही मोठी असली तरी स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा यांचा त्याग करू नये, हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. त्यांचे बलिदान हे भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे.

संभाजी महाराज अत्यंत विद्वान, संवेदनशील आणि कुशल शासक होते. त्यांनी राज्यकारभारात शिस्त, न्याय आणि प्रजेच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांनी शेतकरी, सैनिक आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले.

संभाजी महाराजांच्या विद्वत्तेचा विचार केला तर ते त्या काळातील अत्यंत अभ्यासू राजांपैकी एक होते. त्यांनी संस्कृत साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. 'बुधभूषण' या ग्रंथामध्ये त्यांनी राजकारण, नीतिशास्त्र आणि प्रशासन यांवर विचार मांडले आहेत. युद्धाच्या धामधुमीतही साहित्य आणि ज्ञान यांच्याशी त्यांची नाळ जोडलेली होती. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक व्यापक आणि प्रेरणादायी ठरते.

संभाजी महाराजांनी मराठा साम्राज्य टिकवून ठेवण्यात मोलाची भूमिका बजावली. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण करणे हे अत्यंत कठीण काम होते. कारण मुघल साम्राज्य त्या काळी अत्यंत बलाढ्य होते. औरंगजेब स्वतः दक्षिणेत उतरला होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी जवळपास नऊ वर्षे संघर्ष करत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांनी कधीही शत्रूपुढे शरणागती पत्करली नाही. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी औरंगजेबाला प्रखर प्रतिकार केला. संताजी घोरपडे, धनाजी जाधव आणि इतर मराठा सरदारांनी मुघल सैन्याला हैराण केले. अखेरीस औरंगजेबाचा दक्षिणेतील मोहिमेमध्ये पराभव झाला. यामागे संभाजी महाराजांनी निर्माण केलेली प्रेरणा आणि स्वराज्यनिष्ठा कारणीभूत होती.

छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. आजच्या काळात स्वार्थ, भौतिकता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास दिसून येतो. अशा वेळी संभाजी महाराजांचे जीवन आपल्याला राष्ट्रप्रेम, धैर्य, संघर्षशीलता आणि नीतिमूल्यांची जाणीव करून देते. त्यांनी संकटांना घाबरून न जाता त्यांचा सामना केला. त्यांनी परिस्थितीसमोर कधीही हार मानली नाही. हा संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज महाराष्ट्रात आणि देशभरात संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. व्याख्याने, मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि इतिहास अभ्यास शिबिरे यांच्या माध्यमातून त्यांच्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली जाते. अनेक युवक संघटना आणि सामाजिक संस्था त्यांच्या विचारांचा प्रचार करतात. मात्र केवळ जयंती साजरी करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचे आणि आदर्शांचे पालन करणे अधिक महत्त्वाचे आहे.

संभाजी महाराजांचा इतिहास हा केवळ युद्धांचा इतिहास नाही, तर तो संस्कृती रक्षणाचा इतिहास आहे. त्यांनी हिंदवी स्वराज्याच्या माध्यमातून सर्व समाजघटकांना



एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांचे लोक होते. त्यांनी कधीही जातीय किंवा धार्मिक द्वेषाला प्रोत्साहन दिले नाही. न्याय, समानता आणि स्वराज्य हीच त्यांची भूमिका होती.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची कणखर निर्णयक्षमता. कठीण प्रसंगांमध्ये त्यांनी धैर्याने निर्णय घेतले. युद्धभूमीवर ते स्वतः सैनिकांसोबत लढत असत. त्यामुळे सैनिकांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आदर होता. राजा असूनही त्यांनी कधीही ऐषआरामाला प्राधान्य दिले नाही. त्यांचे जीवन संघर्ष आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक होते.

संभाजी महाराजांच्या काळात मराठा आरमारालाही महत्त्व होते. सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्याविरुद्ध त्यांनी समुद्री संरक्षण मजबूत करण्याचा प्रयत्न केला. किनारपट्टीवरील किल्ले आणि व्यापार यांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी उपाययोजना केल्या. यावरून त्यांच्या प्रशासनातील दूरदृष्टी स्पष्ट होते.

संभाजी महाराजांचे जीवन हे त्यागाचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी स्वतःच्या सुखाचा कधी विचार केला नाही. स्वराज्य आणि धर्मरक्षण हेच त्यांचे ध्येय होते. मृत्यू समोर असतानाही त्यांनी आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. त्यामुळे ते भारतीय इतिहासातील अमर वीर ठरतात.

आजच्या काळात इतिहासाचे योग्य आकलन होणे अत्यंत आवश्यक आहे. इतिहास केवळ गौरवासाठी नसतो, तर तो वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी मार्गदर्शक असतो. संभाजी महाराजांचा इतिहास आपल्याला संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा देतो. त्यांनी संकटांना संधीमध्ये बदलले आणि स्वराज्य टिकवून ठेवले.

संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनातील मूल्यांचा विचार करणे गरजेचे आहे. राष्ट्रप्रेम, स्वाभिमान, कर्तव्यनिष्ठा, विद्वत्ता आणि धैर्य ही मूल्ये समाजात रुजली तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आजच्या युवकांनी त्यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करून त्यातून प्रेरणा घ्यावी. मोबाईल आणि सामाजिक माध्यमांच्या आहारी जाण्याऐवजी इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक आहे.

छत्रपती संभाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे बलिदान भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी राष्ट्रहित, सामाजिक एकता आणि नैतिक मूल्ये जपण्याचा संकल्प केला पाहिजे.

मराठ्यांच्या इतिहासातील तेजस्वी पर्व म्हणून संभाजी महाराजांचे नाव सदैव स्मरणात राहील. त्यांचे जीवन संघर्षाचे, शौर्याचे आणि अटळ निष्ठेचे प्रतीक आहे. त्यांनी दाखवून दिले की कोणतेही संकट मनुष्याच्या आत्मबलापुढे मोठे नसते. अन्यायाविरुद्ध उभे राहणे, सत्यासाठी लढणे आणि राष्ट्रासाठी बलिदान देणे हेच खरे जीवनमूल्य आहे.

आजही महाराष्ट्रातील गड-किल्ले संभाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देत उभे आहेत. प्रत्येक किल्ला त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगतो. त्यांच्या स्मृती आजही जनमानसात जिवंत आहेत. गावागावांतून त्यांच्या जयंतीनिमित्त उत्साह दिसून येतो. युवकांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष आकर्षण आणि आदर आहे.

संभाजी महाराजांचे विचार समाजाला एकत्र आणणारे आहेत. त्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष केला, पण कधीही मानवतेचा त्याग केला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शौर्याबरोबरच संवेदनशीलताही होती. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्यामुळे ते लोकाभिमुख राजा म्हणूनही ओळखले जातात.

छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी त्यांच्या जीवनावर आधारित अभ्यास, व्याख्याने आणि उपक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. इतिहासाचे योग्य ज्ञान मिळाल्यास युवकांमध्ये राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होईल.

छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन हे एका जाज्वल्य राष्ट्रभक्ताचे जीवन होते. त्यांनी स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता स्वराज्याचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे मराठा साम्राज्य अधिक मजबूत झाले आणि पुढे पेशव्यांच्या काळात मराठ्यांनी दिल्लीपर्यंत झेंडा फडकवला. त्यामुळे संभाजी महाराजांचे योगदान मराठा साम्राज्याच्या विस्तारामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य केले पाहिजे. भ्रष्टाचार, अन्याय, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. स्वाभिमानी, चारित्र्यसंपन्न आणि राष्ट्रनिष्ठ नागरिक घडविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

छत्रपती संभाजी महाराज हे भारतीय इतिहासातील अजरामर व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे शौर्य, विद्वत्ता आणि बलिदान यामुळे ते सदैव जनमानसात जिवंत राहतील. १४ मे रोजी साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ उत्सव नसून प्रेरणेचा आणि स्वाभिमानाचा दिवस आहे. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा निर्धार केला पाहिजे. राष्ट्र आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी आवश्यक असलेली जिद्द, धैर्य आणि निष्ठा यांचे तेजस्वी उदाहरण म्हणून छत्रपती संभाजी महाराजांचे नाव भारतीय इतिहासात सदैव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल.




लेखक
डॉ. राजेंद्र बगाटे

छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या ०९ वर्षांच्या कार्यकाळात १२० पेक्षा जास्त लढाया लढल्या आणि त्या सर्व लढायांमध्ये ते अजिंक्य राहिले.

त्यांच्या प्रमुख आणि महत्त्वपूर्ण विजयी मोहिमा खालीलप्रमाणे आहेत:

* बुरहानपूरची मोहीम (१६८१): संभाजी महाराजांनी गादीवर आल्यावर मुघलांचे दक्षिणेतील प्रमुख व्यापारी केंद्र असलेल्या बुरहानपूरवर प्रचंड वेगाने छापा टाकला. त्यांनी मुघल फौजेचा पूर्ण पराभव करून संपूर्ण शहर ताब्यात घेतले आणि मुघल साम्राज्याला मोठा आर्थिक फटका दिला.

* रामशेज किल्ल्याचा यशस्वी बचाव (१६८२): नाशिकजवळील हा छोटासा किल्ला जिंकण्यासाठी मुघल बादशहा औरंगजेबाने आपले सर्वोत्तम सरदार आणि मोठी फौज पाठवली होती. मात्र, संभाजी महाराजांच्या उत्कृष्ट युद्धनीतीमुळे मराठ्यांनी तब्बल साडेपाच वर्षे हा किल्ला यशस्वीपणे लढवला आणि मुघलांना रिकाम्या हाताने परतावे लागले.

* कल्याण-भिवंडीची लढाई: मुघल सेनापती हसन अली खान याने मोठ्या फौजेसह कोकणात उतरण्याचा प्रयत्न केला. संभाजी महाराजांच्या सैन्याने त्याला कल्याण-भिवंडीच्या युद्धात अत्यंत धूळ चारली आणि मुघल सैन्याला माघार घेण्यास भाग पाडले.

* गोवा आणि फोंडा मोहीम (१६८३): मुघलांना मदत करणाऱ्या पोर्तुगीजांना धडा शिकवण्यासाठी संभाजी महाराजांनी गोव्यावर आक्रमण केले. त्यांनी फोंडा किल्ला जिंकला आणि पोर्तुगीजांचा गव्हर्नर अल्व्होर याला युद्धात पराभूत करून पोर्तुगीज सत्तेला नामोहरम केले.

* म्हैसूर मोहीम (१६८२): म्हैसूरचा राजा चिक्कदेव राय याने मुघलांशी हातमिळवणी करण्याचा प्रयत्न केला होता. संभाजी महाराजांनी दक्षिण मोहिमेदरम्यान त्याचा बनवारच्या लढाईत पराभव केला आणि त्याला मराठा साम्राज्याला खंडणी देण्यास भाग पाडले.

* सिद्दी विरुद्ध जंजिरा मोहीम: कोकण किनारपट्टीवर रयतेला त्रास देणाऱ्या जंजिराच्या सिद्दीविरुद्ध त्यांनी बलाढ्य आरमार उभे करून तीव्र हल्ला चढवला. सिद्दीच्या नौदलाचा पराभव करून त्यांनी सिद्दीला बॅकफूटवर आणले.

* वाईची लढाई (१६८७): मराठा आणि मुघल सैन्यामध्ये वाई आणि महाबळेश्वरच्या घनदाट जंगलात ही भीषण लढाई झाली. या युद्धात मराठ्यांनी मुघल फौजेचा धुव्वा उडवला, मात्र मराठ्यांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांना या युद्धात वीरमरण आले.

# अति-प्रक्रिया केलेल्या अन्नामुळे हृदयविकारात वाढ

**समृद्धी धायगुडे**

हल्ली जीवनशैलीशी निगडित विविध आजारांना सर्वच वयोगटातील नागरिक बळी पडत आहे. या आजारांपैकी एक प्रामुख्याने आढळणारा आजार म्हणजे हृदयाशी सबंधीत. 'युरोपियन कार्डिओलॉजी सोसायटी'च्या एका अहवालाने लोकांच्या खाण्याच्या सवयींबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. 'युरोपियन हार्ट जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या या अहवालात म्हटले आहे की, जे लोक अति-प्रक्रिया केलेले अन्न जास्त प्रमाणात खातात, त्यांना हृदयविकार आणि अकाली मृत्यूचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, ही केवळ पोषणाची समस्या नाही, तर आता याला हृदयविकाराचे एक प्रमुख कारण म्हणून पाहिले जात आहे.

**अति-प्रक्रिया केलेले अन्न म्हणजे काय?**


अति-प्रक्रिया केलेले अन्न म्हणजे कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्पादित केलेली उत्पादने. त्यामध्ये असे पदार्थ आणि रसायने असतात, जे सामान्य घरगुती स्वयंपाकघरात वापरले जात नाहीत. कृत्रिम चव, रंग, गोडवा आणि विविध प्रकारचे अतिरिक्त घटक समाविष्ट असतात, जे अन्न अधिक काळ टिकवण्यासाठी आणि त्याची चव वाढवण्यासाठी घातले जातात.

या प्रकारचे अन्न पदार्थ म्हणजे इन्स्टंट नूडल्स, पॅकेज केलेले स्नॅक्स, शीतपेये, फास्ट फूड, प्रक्रिया केलेले मांस, फ्रोझन पिझ्झा, नाश्त्याचे पदार्थ आणि खाण्यासाठी तयार असलेले विविध पदार्थांचा समावेश होतो.

**हृदयरोगाशी संबंध**

अहवालानुसार, जे लोक मोठ्या प्रमाणात प्रक्रिया केलेले अन्न खातात, त्यांना हृदयरोगाचा धोका १९ टक्क्यांनी वाढू शकतो. इतकेच नाही, तर अनियमित हृदयाच्या ठोक्यांचा धोका १३ टक्क्यांनी वाढू शकतो आणि काही प्रकरणांमध्ये हृदयविकारामुळे मृत्यू होण्याचा धोका ६५ टक्क्यांनी वाढू शकतो.

ही आकडेवारी शास्त्रज्ञांसाठी चिंतेचा विषय आहे, कारण जगभरात हृदयरोग हे मृत्यूचे एक प्रमुख कारण आहे. युरोपियन कार्डिओलॉजी सोसायटीच्या तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, डॉक्टरांनी आता रुग्णांना त्यांच्या आहारात किती प्रक्रिया केलेले अन्न आहे, हे देखील विचारात घेतले पाहिजे.



**आरोग्यावर कसा परिणाम होतो**

तज्ज्ञांच्या मते, हे अन्न शरीरावर वेगवेगळ्या प्रकारे परिणाम करू शकते. ते शरीरातील दाह वाढवू शकते, पचनसंस्था आणि आतड्यातील जीवाणूंवर परिणाम करू शकते, आणि शरीराच्या नैसर्गिक भूक आणि तृप्तीच्या प्रक्रियेत अडथळा आणू शकते.

बरेच पदार्थ इतके आकर्षक चवीचे बनवले जातात की, लोक ते गरजेपेक्षा जास्त खातात. या सवयीमुळे हळूहळू लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांसारख्या समस्या निर्माण होतात, ज्यामुळे पुढे हृदयरोग होऊ शकतो. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, ही समस्या एकाच घटकामुळे होत नाही; उलट, विविध आरोग्य समस्या एकत्र येऊन हृदयाला कमकुवत करतात. आधुनिक जीवनशैली आणि बदलत्या सवयी अहवालात असेही म्हटले आहे की, गेल्या काही वर्षांत लोकांच्या खाण्याच्या सवयींमध्ये लक्षणीय बदल झाला आहे. वेगवान जीवनशैली, कामाचा ताण, झटपट ऍन पदार्थ पोहोचवणारी ऍप आणि स्वस्त पॅकेज्ड फूडने ताज्या घरगुती जेवणाची जागा घेतली आहे. बऱ्याच देशांमध्ये, लोकांच्या दैनंदिन कॅलरीजचा मोठा भाग आता या प्रक्रिया केलेल्या पदार्थांमधून येतो. उदाहरणार्थ, काही युरोपीय देशांमध्ये, हा आकडा ५० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचे सांगितले जाते. हा बदल हळूहळू होत आहे, त्यामुळे लोकांच्या आहारात किती बदल झाला आहे हे त्यांच्याही लक्षा-तही येत नाही.

अगदी आरोग्यदायी दिसणारे पदार्थही धोक्याचे अहवालाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, सर्वच प्रक्रिया केलेले पदार्थ लगेचच अनारोग्यदायी वाटत नाहीत. बरेच प्रोटीन बार, कमी चरबीचे दही आणि डाएट स्नॅक्स आरोग्यदायी पर्याय म्हणून सादर केले जातात, परंतु त्यांमध्येही अतिरिक्त प्रक्रिया असू शकते. यामुळे लोकांना आपण आरोग्यदायी खात आहोत असा गैरसमज होतो, पण प्रत्यक्षात ते अधिक प्रक्रिया केलेले पदार्थ खात असतात.


**शास्त्रज्ञांचा इशारा** -शास्त्रज्ञांनी हे देखील स्पष्ट केले आहे की, आजपर्यंतचे बहुतेक अभ्यास हे निरीक्षणात्मक आहेत. याचा अर्थ असा की, ते संबंध दर्शवतात, परंतु प्रत्येक बाबतीत थेट कार्यकारणभाव सिद्ध करत नाहीत. त्यामुळे, तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, हे परिणाम अधिक स्पष्टपणे समजून घेण्यासाठी पुढील, दीर्घकालीन संशोधनाची आवश्यकता आहे.

**या अहवालाचे निष्कर्ष**

खाण्याच्या सवयींवर पुनर्विचार करण्याची गरज हा नवीन अहवाल आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो, आधुनिक खाण्याच्या सवयींचा आपल्या आरोग्यावर गंभीर परिणाम करत आहेत. आजच्या वेगवान जीवनात अतिप्रक्रिया केलेले अन्न सामान्य झाले आहे, परंतु त्याचे अतिसेवन केल्यास दीर्घकाळात गंभीर आजार होऊ शकतात.प्रत्येक वयोगटातील व्यक्तीने आपल्या अन्न निवडीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे आणि शक्य तितके ताजे व कमी प्रक्रिया केलेल्या अन्नाला प्राधान्य दिले पाहिजे.

## उशिरा येण्याची शिक्षा


महात्मा गांधी नियमांचे पालन अतिशय काटकोरपणे करत असत. ते प्रत्येक नियम मोठ्या विचारपूर्वक तयार करत असत. स्वत: ही काटेकारपणे पालन करीत. त्यांच्या आश्रमात जेवणासाठी हजर राहण्यासाठी दोन वेळा घंटा वाजवून सूचना देण्यात येत असे. जो दुसऱ्या घंटेनंतर येत असे त्याला दुसऱ्या पंक्तीत बाहेर उभे राहावे लागत असे. अगदी त्या पंक्तीत जागा रिकामी असली तरी ! गांधीजी त्यास उशिरा येण्याची गोड शिक्षा संबोधत असत. दुसऱ्या घंटेनंतर नियमाप्रमाणे भोजनगृहाचे दरवाजे बंद केले जात असत. मग कोणालाही आत प्रवेश नसे. एकदा स्वत: गांधीजींना उशीर झाला. दरवाजा बंद करणारे आश्रम वासी गांधीजींना येताना पाहून घुटमळले. तेवढ्यात महादेव भाईंनी त्यांना सांगितले, काय आपल्याला बापूजींकडून शिक्षा घ्यायचीय का ? लवकर दरवाजा बंद करा . नियमाप्रमाणे गांधीजीं व्हरांड्यात उभे राहिले. नियमांचे पालन होत आहे हे पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. त्याचवेळी तेथे हरिभाऊ उपाध्याय आले व बापूजींना उभे पाहून म्हणाले, बापूजी, आज आ-पणही गुन्हेगारांच्या रांगेत आलात ? जेवणास उशिरा आल्यामुळे ही गोड शिक्षा तुम्हालाही भोगावी लागत



# हुंडाबळीत सहजासहजी जामीन नको : एससी

महिलाविरोधी असलेल्या गंभीर गुन्ह्यात न्यायालये सौम्य भूमिका घेतात, असे चित्र समाजात पसरू नये, याची काळजी न्यायालयांनी घ्यावी व महिलाविरोधी गुन्ह्यात विशेषत: हुंडाबळी सारख्या घटनांमध्ये आरोपींना सहजासहजी जामीन मिळणार नाही; याची दक्षता घ्यावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने एका अपिलात दिले असून, देशात हुंडाबळीच्या वाढलेल्या घटनांबाबत चिंता व्यक्त करत उच्च न्यायालयाने हुंडाबळीतील आरोपीला मंजूर केलेला जामीन रद्द केला आहे.चार दिवसांपूर्वी ३० एप्रिल २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला व न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांचे पीठाने महेश चंद विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य या अपिलात महत्त्वपूर्ण विश्लेषण करीत नोंदणी योग्य आदेश दिला आहे. अपिलाची सविस्तर माहिती अशी की, सदर खटल्यातील मृत पत्नी व जाब देणार २ यांचा विवाह ८ फेब्रुवारी २०१९ रोजी झाला होता. सदर लग्नानंतर मयत महिलेचा सासरच्या कुटुंबीयांनी हुंड्यासाठी छळ चालू केला. दिनांक ११ जुलै २०२४ रोजी सासरी असताना मुलीचा संशयास्पद मृत्यू झाला. १२ जुलै २०२४ रोजी मयत मुलीच्या वडिलांनी उत्तर प्रदेशातील गाजियाबाद जिल्ह्यातील कवीनगर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली की, माझ्या मुलीच्या लग्नात मी सुमारे ३० लाख रुपये खर्च करून, ज्यामध्ये आय-२० ही महागडी मोटार गाडी, रोख रक्कम १० लाख व गृहोपयोगी वस्तू, दाग-दागिने लग्नात दिले व लग्न करून दिले.

इतक्या महागड्या वस्तू दिल्या तरी, सासरकडचे लोक समाधानी नव्हते. तिचा पती, सासू, सासरा, दीर, आजेसासरा व काका, काकू सर्वजण एकत्र राहत असताना सर्वांनी आणखी दहा लाख रुपये रोख व एक फॉर्च्यूनर मोटार गाडी याची मागणी ते करत होते. हुंड्यासाठी तिचा शारीरिक व मानसिक छळ करत तिला भुकेली व तहानलेली ठेवत असत. तिने हुंडा आणला नाही तर, तिला गळफास देऊन मारू, अशी धमकी देत असत. तरीही, वडिलांनी पुन्हा चार लाख रूपये खात्यावर व पाच लाख रुपये रोख रक्कम त्यांना लग्नानंतर देखील दिली. ११ जुलै २०२४ रोजी शेवटचे वडिलांना फोन झाला तेव्हा, ती घाबरलेली होती व रडत-रडत तिने आपल्याला फास लावून मारणार असल्याची धमकी दिल्याचे सांगितले. त्याचवेळी तिच्या काकाने मुलीच्या भावाला फोन करून सांगितले की, तिचा पती तिला गळफास देऊन मारत आहे. तुम्ही मागण्या पूर्ण न केल्याने आता तुम्ही जे करायचे ते करा. त्यानंतर मुलीचे वडील स्वतः तिथे पोहोचले तर, मुलगी घरी नव्हती तर, शेजारील लोकांनी सांगितले की, तुमच्या मुलीला मारून सासरचे लोक तिला दवाखान्यात घेऊन गेले आहेत. वडील दवाखान्यात गेले असताना तिथे सासरचे कुणी नव्हते व मुलगी मृत झालेली होती. वडिलांच्या या तक्रारीवरून पोलिसांनी तिचा पती, सासरा, सासू, दीर, काका, काकू व आजोबा यांच्यावर हुंडा प्रतिबंधक कायदा, तसेच खु-नाची धमकी, हुंड्यासाठी छळ व खुनाचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर पतीने जामिनासाठी जिल्हा



कायदा समजून घेताना : ॲड. जी.एम. आळंदीकर, बारामती, मो. ९४२३०२०२५५

न्यायालयात अर्ज दाखल केला. जिल्हा न्यायालयाने तो फेटाळला त्यावर त्याने अलाहाबाद उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. तिथे उच्च न्यायालयाने मुलीचा मृत्यू गुदमरुन झाला व फिर्याद एक दिवस उशिरा दाखल केली, या कारणाने पतीचा जामीन मंजूर केला.

सदर जामीन रद्द व्हावा म्हणून, मुलीच्या वडिलांनी सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकून वरील खंडपीठाने स्पष्ट केले की, उच्च न्यायालयाने पतीचा जामीन अर्ज मंजूर करून गंभीर चूक केली आहे. सदरचा मृत्यू त्या महिलेचे लग्न झाल्यानंतर सात वर्षांच्या आत झालेला असून, भारतीय साक्ष अधिनियम २०२३ चे कलम ११८ जे पूर्वी पुरावा कायदा कलम ११३(ब) त्यानुसार जेव्हा एखाद्या महिलेचा मृत्यू संशयास्पद होतो व तिचा मृत्यूपूर्वी हुंड्यासाठी छळ झाल्याचे स्पष्ट असेल तर, असा मृत्यू हुंडाबळी म्हणून समजला जातो. ही बाब उच्च न्यायालय पूर्णतः विसरले. त्याचबरोबर, महिलेच्या शवविच्छेदन अहवालामध्ये तिच्या गळ्याभोवती, छाती भोवती व चेहर्यावर असलेल्या जखमा या गोष्टींकडे देखील उच्च न्यायालयाने दुर्लक्ष केले. त्यामुळे उच्च न्यायालयाने केवळ उशिरा तक्रार दिली, असे म्हणणे चूक आहे. एका दिवसानंतर वडिलांनी इतकी सविस्तर तक्रार दिली असताना एका दिवसाचा उशीर म्हणजे, हुंडाबळीपेक्षा क्रूर कृत्य नाही, असे सांगत उच्च न्यायालयाने त्याकडे गंभीरतेने न पाहता जामीन मंजूर केला, ही बाब धक्कादायक आहे. संपूर्ण देशातच हुंडाबळी अद्याप वाढत आहेत. याबाबत चिंता व्यक्त करताना वरील खंडपीठ म्हणते की, महिलांना इतक्या मोठ्या शैक्षणिक संधी दिलेल्या असताना देखील महिला अद्याप हुंडाबळीच्या शिकार होत आहेत, ही बाब गंभीर आहे. या अगोदरच्या काही खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, असा धोका नष्ट करण्यासाठी प्रत्येक मुलीने व वडिलांनी हुंडा देण्याचे टाळले पाहिजे. त्याकरीता, मोठी सामाजिक क्रांती घडली पाहिजे. समाजात हुंडाविरोधी जागृती झाली पाहिजे. मुलगी परक्याचे धन ही संकल्पना बंद झाली पाहिजे. चुकीच्या रूढी परंपरांमुळे आपल्या मुलीचा जीव आपण धोक्यात घालतो, हे लक्षात घेऊन वागले पाहिजे. फक्त २०२३ मध्ये ६१५६ इतक्या हुंडाबळीच्या घटना घडल्या असून, उत्तर प्रदेश, बिहार सारख्या ठिकाणी याचेप्रमाण जास्त आहे. हुंड्याच्या उद्देशाने देशभरात एकाच वर्षांत २०२३ मध्ये ८३३ खून झाले आहेत. हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत ८३ हजार ३२७ खटले २०२३ मध्ये सुनावणीसाठी आले, त्यापैकी ६९ हजार ४३४ खटले पुढच्या वर्षीसाठी लांबले गेले. २७ हजार १५४ पुरुष व स्त्रियांना अटक झाली आहे. त्यामुळे जामीन करताना न्यायालयांनी अतिशय काळजीपूर्वक जामीन केले पाहिजेत.

विविध खटल्यांचा उहापोह करीत वरील पीठाने हुंडाबळी खटल्यांच्या वाढत्या घटनांबाबत चिंता व्यक्त करीत, अशा घटनांमध्ये सहजासहजी जामीन देऊ नये, असे निर्देशच सर्वोच्च न्यायालयाने दिले असून, सबंधित पतीचा अलाहाबाद उच्च न्यायालयाने मंजूर केलेला जामीन रद्द करून एक वर्षाच्या आत खटला निकाली लावावा, असे आदेश दिले व एका आठवड्यात पतीने कारागृहाकडे स्वतः ला स्वाधीन करावे, असे आदेश देत उच्च न्यायालयाचा जामीन मंजूरचा आदेश रद्द केला आहे. एकूणच सर्व न्यायालयांना नागरिकांना व पोलिसांना देखील मार्गदर्शक असा महत्त्वपूर्ण निकाल या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

इरेक्शनमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या कसे रोखाल?संशोधनानुसार, लैंगिक इरेक्शनच्या समस्या रोखण्यासाठी फ्लॅव्होनाईट्स सेवन करणं आवश्यक आहे. अभ्यासानुसार ब्ल्यूबेरीमध्ये आढळणारं ॲन्थोसायनिन हे एक प्रकारचं फ्लॅव्होनाईड आहे.तसंच इतर लिंबूवर्गीय फळांमध्ये ते आढळून येतं. फळांच्या सेवनामुळे लैंगिक समस्येत १४ टक्क्यांपर्यंत सुधारणा होऊ शकते. फ्लॅव्होनाईडयुक्त आहाराचे सेवन तसेच व्यायाम यांच्या मदतीने ही समस्या २१ टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. त्यामुळे आपल्या आहारात फळांचा अधिक समावेश करायला हवा. काही संशोधकांच्या मते, भूमध्य समुद्राच्या आसपास राहणाऱ्या लोकांच्या पद्धतीनु-सार आहार घेतल्यास त्याचा फायदा होऊ शकतो.




## २ Joke विनोद




पिंटू शाळेतील पहिल्या दिवशी जाऊन घरी आला व आईला म्हणाला, ङ्गआई, बाईंनी विचारले की, तुला आणखी काही लहान भावंडे आहेत का?फ तेव्हा पिंटू म्हणाला की ङ्गनाहीतफ तेव्हा बाईंनी नि:श्वास सोडला व म्हणाल्या, ङ्गदेव पावला.

## ३ Message संदेश



Kutton ka TV Serial
Agar Kutton ka TV pr 1 Channel ho to Socho Usme Serials ke Naam kuch Aise honge..Yahan Me Gahr Gahr BHONKI
.KAAT KHANA Sathiya
.Agle Janam mohe KUTIYA hi kijo
.Me KUTIYA Tere Aangan ki
.Ye KUTTA kya Kehlata hai
.Ek Hazaro me Meri Kutiya hai
.Afsar Kutiya
Is Kutte ko kya Naam dun
Bade Kutte lgte hen..

## ४ Thought सुविचार


निष्काम कर्म म्हणजे कर्मत्याग नव्हे. - भगवद्गीता



**संस्कृत सुभाषित**

**अद्रोहं सर्वभूतेषु कर्मणा मनसा गिरा**
**अनुग्रहश्च दानं च शीलमेतत्प्रशस्यते ।।**
**(शांतीपर्व, अध्याय १२४, श्लोक ६६,** महाभारत)**अर्थ :** कृतीने, मनाने आणि वाणीने कोणत्याही प्राण्यास त्रास न देणे, परोपकार करणे, दान करणे या प्रकाराचे शील प्रशस्त होय.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. अननुभवी
५. देवापाशी मागितलेला निर्णय
६. पवित्र
९. एक सुगंधी वनस्पती
१०. जंगलातील प्राणी
१२. वारा
१३. वाईट असल्यास आयुष्य नासवणारी
१४. नासाडी, नाश
१५. हात
१६. चटकन
१८. शपथ
१९. भाज्या घालून केलेला भात
२०. सरसकट
२२. खानदान, कूळ
२३. रमापती
२५. दारूचा प्रकार
२६. कपाळ
२७. कशा प्रकारचा?
२९. वर्ष
३१.गाडीचे छत
३३. सोन्याचा धागा
३४. सुंदर तरुणी
३५. डोळे
३६. असह्य वेदना
३८. लक्ष्मी
४२. पंचमहाभूतापैकी अग्नीचे रूप
४३. टप्प्या टप्प्याने केलेला प्रवास
४६. आकर्षक
४८. मूळ अर्थ धनुष्य, उद्धट, दांडगा (ला.)
४९. यापेक्षा फळे चिरून खाणे चांगले!
५०. च्या बरोबर
५१. क्षण (हिंदी)
५३. भंगार (हिंदी)
५५. अस्सल मातीतले
५६. खुंट, आंचळ
५७. घाबरट
५९. सुविधा
६०. हक्क सांगणारा, वैरी
६२. मध
६४. पांढुरका, कडक
६६. नासाडी, धूळधाण
६८. पत्र, टपाल
६९. गवताचे पान
७०. डोंगराचा सुळका, पोळीची किनार
७२. वाळवंटातून आलेला फुलांचा राजा
७४. स्तुती करणारा दरबारी
७५. स्वत:ला
७६. रघुपती बरोबर घेतली जाणारी रामाची आणखी दोन नावे
८०. दाक्षिणात्यांच्या जेवणातील हा पदार्थ इतका मुख्य की त्याला 'अन्न' असेच संबोधतात
८१. मृत्यू नसलेला
८२. पकडण्याचे साधन- मासा किंवा काहीही!
८३. चांदोबाची खेळण्याची जागा

## उभे शब्द

१. 'फारच मोठे प्रास्ताविक' याअर्थी प्रचलित म्हण
२. उत्तराधिकारी
३. रानरेडा
४. प्रतिष्ठा
५. गांधारीचे पुत्र
६. पोटाला चांगला नसलेला पोळीला पर्याय
७. अरण्य
८. यंदा पावसाळ्यात अशा पावसाचा अभावच होता
१०. वरपांगी
११. एवढी तरी हवीच अशी हालचाल
१२. घागरा
१३. समस्या, पेच
१५. विद्या
१७. सत्व
१८. दूध न देणारी गाय
१९. पुण्याचा रहिवासी
२१. घोडागाडी
२४. मत्स्य
२६. हिंदुस्तान
२८. चाणक्यनीती
३०. सोन्याचे नाणे
३२. उद्याच्या नंतरचा दिवस
३३. जय मिळवून देणारे
३७. विविध
३९. मस्ती, गर्व
४०. समय
४१. आजपर्यंत
४३अ. वजनाला भारी
४४. किंमत
४५. सैन्याचा दाणागोटा
४६. महात्मा गांधीजींचे नाव
४७. चषक
४८. फरशीनंतर असलेला लादीचा प्रकार
५०. सरळ मोठा वासा
५२. मनाची इच्छा
५३. टाळ्यांनी मिळालेली मोठी दाद
५४. विरोध, प्रतिबंध
५६. विषमच्या विरुद्ध
५८. भीती
६१. प्रमाणपत्र
६३. कधी रावाचा होतो, कधी याचा राव!
६५. पोस्ट ऑफीस (हिंदी)
६७. नट्टापट्टा
६९. पाचोळा
७१. खेळी
७३. पोशाखाची कळ
७४. नशीब, दैव
७५. अभिप्राय
७६. राघव
७७. संताप
७८. अग्नी, ज्वाळा
७९. अंत:करण

## आडवे उत्तरे

१.नवागत ५.कौल ६.पावन ९.मरवा १०.वनचर १२.पवन १३.संगत १४.नास १५.कर १६.लवकर १८.भाक १९.पुलाव २०.सकटनिकट २२.घराणे २३.रमावर २५.रम २६.भाल २७.कसा २९.साल ३१.टप ३३.जर ३४.रमणी ३५.नयन ३६.मरणयातना ३८.रमा ४२.तेज ४३.मजल दरमजल ४६.मोहक ४८.कोदंड ४९.रस ५०.सह ५१.पल ५३.कबाड ५५.गावरान ५६.सड ५७.भेदरट ५९.सोय ६०.दावेदार ६२.मकरंद ६४.करडा ६६.तसनस ६८.डाक ६९.पात ७०.कडा ७२.गुलाब ७४.भाट ७५.मला ७६.राघव राजाराम ८०.भात ८१.अमर ८२.गळ ८३.नभांगण

## उभे उत्तरे

१.नमनाला घडाभर तेल २.वारस ३.गवा ४.मान ५.कौरव ६.पाव ७.वन ८.संततधार १०.वरवर ११.चलनवलन १२.परकर १३.संकट १५.कला १७.कस १८.भाकड १९.पुणेकर २१.टमटम २४.मासा २६.भारत २८.साम दाम दंड भेद ३०.होन ३२.परवा ३३.जयावह ३७.नाना ३९.माज ४०.काल ४१.आजतागायत ४३अ.जड ४४.दर ४५.रसद ४६.मोहनदास ४७.कप ४८.कोबा ५०.सरा ५२.लहर ५३.कडकडाट ५४.हरकत ५६.सम ५८.डर ६१.दाखला ६३.रंक ६५.डाकघर ६७.नखरा ६९.पाला ७१.डाव ७३.बटण ७४.भाग्य ७५.मत ७६.राम ७७.राग ७८.जाळ ७९.मन




## थोडक्यात/ संक्षिप्त

### बॅट्समननी ट्रिपल, डबल अन् सेंच्युरीही ठोकली!

मुंबई–क्रिकेटच्या मैदानामध्ये रोजच नवनवे विक्रम पाहायला मिळतात. खासकरून टी–२० क्रिकेटचा उदय झाल्यापासून वनडे आणि टेस्ट क्रिकेटमध्येही बॅटर आक्रमक बॅटिंग करायला लागले आ–हेत, त्यातच आता वनडे क्रिकेटमध्ये नवा विक्रम नोंदवला गेला आहे. ५० ओव्हरमध्येच टीमने तब्बल ८२२ रन कुटल्या. एवढंच नाही तर या आव्ह–ानाचा पाठलाग करायला आलेली टीम फक्त २८ रनवर ऑलाआऊट झाली.८२२ रनच्या या विक्रमी स्कोअरमध्ये टीमच्या एका खेळाडूने ट्रिपल सेंच्युरी ठोकली, तर दुसऱ्याने डबल सेंच्युरी आणि तिसऱ्याने सेंच्युरी केली. ५० ओव्हरमध्ये टीमने ८२२४ एवढा मोठा स्कोअर केला. टीमने ५० ओव्हरमध्ये तब्बल १६.४४ रन प्रती ओव्हरच्या रनरेटने बॅटिंग केली.
कुठे झाला हा विक्रम?
हा अद्भूत विक्रम झिम्बाब्वेतील स्थानिक फर्स्ट लीग क्रिकेटमध्ये झाला आहे. जागतिक क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच एका टीमने वनडे क्रिकेटमध्ये इतका स्कोअर केला आहे. स्कॉर्पियन्स क्रिकेट क्लब आणि मिथेन्स लायन्स यांच्यात झालेल्या या सामन्यात स्कॉर्पियन्स क्रिकेट क्लबने ५० ओव्हरमध्ये ८२२४ इतका स्कोअर केला. या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या मिथेन्स लायन्सने २८७ एवढाच स्कोअर केला.

### रायपूरमध्ये पावसाचा कहर

रायपूर–ओायपीएल २०२६ मधील ५७वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात रायपूरमध्ये खेळवला जाणार होता. मात्र पावसामुळे टॉसला उशीर झाला आणि त्यामुळे या सामन्याच्या निकालाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. प्लेऑफच्या शर्यतीत दोन्ही संघांसाठी हा सामना अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. अशातच जर हा सामना पावसामुळे रद्द झाला, तर प्लेऑफचं समीकरण नेमकं कसं बदलणार? जाणून घ्या संपूर्ण गणित.सर्वप्रथम पॉइंट्स टेबलकडे नजर टाकली तर आसरीबी सध्या १४ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. तर केकेआरचे ९ गुण असून संघ आठव्या क्रमांकावर आहे. त्यामुळे कोलकात्याचा प्लेऑफचा मार्ग बंगळुरूपेक्षा अधिक कठीण दिसत आहे. जर पावसामुळे आरसीबीविरुद्ध केकेआर सामना रद्द झाला, तर दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण दिला जाईल. अशा परिस्थितीत १२ सामने पूर्ण झाल्यानंतर आरसीबीचे १५ गुण होतील. आयपीएल इतिहास पाहिला तर १५ गुणांसहही काही संघांनी प्लेऑफ गाठले आहेत. मात्र आरसीबीने उरलेल्या दोन सामन्यांपैकी एक जरी जिंकला, तरी त्यांचे १७ गुण होतील आणि त्यांचे प्लेऑफ तिकीट जवळपास निश्चित मानले जाईल.

### युवराज सिंगच्या मेव्हण्याच्या नावावर अतिशय कठीण असलेला विक्रम

दिल्ली–जगातील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडूंमध्ये ज्याचे नाव घेतले जाते अशा युवराज सिंहने त्याच्या कारकिर्दीत अनेकवेळा अप्रतिम कामगिरी केली. त्याने २०११ च्या एकदिवसीय क्रिकेड वर्ल्ड कप स्पर्धेत फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागात चांगली कामगिरी केली, त्यामुळे त्याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. भारताच्या विजयानंतर युवराजचे नाव इतिहासात कोरले गेले. सध्या युवराज सिंग क्रिकेटपासून दूर आहे. पण त्याचे नाव अनेक कारणांनी चर्चेत असते.युवराज सिंगचा मेहुणा असलेला भारतीय संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा याने आयपीएलमध्ये असा विक्रम केला आहे, जो मोडणे जवळपास अशक्य मानले जाते.रोहित शर्माची पत्नी रितिका सजदेह ही युवराज सिंहची मानलेली बहीण आहे. त्यामुळे रोहित शर्मा हा युवराज सिंहचा मेहुणा आहे. रोहित आणि रितिका यांनी लग्नापूर्वी जवळपास सहा वर्षे एकमेकांना डेट केले आणि डिसेंबर २०१५ मध्ये विवाह केला. एका मुलाखतीदरम्यान रोहित शर्माने २००८ मधील एक मजेशीर किस्सा सांगितला होता. एका जाहिरात शूट दरम्यान युवराज सिंहने रोहितला रितिकापासून दूर राहण्यास सांगितले होते.

### ८ वर्षे एकच बॉक्सर शॉर्ट्स घालून खेळतोय एडरसन

दिल्ली–क्रीडा जगतात अनेक खेळाडूंच्या स्वत:च्या काही खास सवयी किंवा धारणा असतात. अनेकदा या सवयींमुळे ते चर्चेत येतात, तर काही लोक याला अंधश्रद्धा देखील मानतात. सध्या अशाच एका अजब सवयीमुळे ब्राझीलचा प्रसिद्ध गोलकीपर एडरसन मोराएस याची फुटबॉल विश्वात भरपूर चर्चा आहे. एका मुलाखतीत त्याने स्वत:च ही माहिती दिली आहे.मागील ८ वर्षांपासून एकच बॉक्सर शॉर्ट्स
मफुटबॉल फोकसफ्ला दिलेल्या मुलाखतीत बोल–ताना एडरसन म्हणाला, मी गेल्या आठ वर्षांपासून प्रत्येक सामन्यासाठी एकच बॉक्सर शॉर्ट्स (अंडरवेअर) घालून खेळत आहे. माझ्यासाठी ती शॉर्ट्स खूप लकी (भाग्यवान) आहे.प्रदीर्घ काळ मँचेस्टर सिटीकडून खेळल्यानंतर एडरसन आता तुर्की सुपर लीगच्या मफेनर्बाशफया प्रसिद्ध संघाकडून खेळत आहे.मँचेस्टर सिटीमधील कामगिरी: मँचेस्टर सिटीसाठी एडरसन एकूण २७६ सामने खेळला. तो २०२२ मधील ऐतिहासिक ट्रेबल विजेत्या संघाचा महत्त्वाचा सदस्य होता.

# विराटच्या वादळी शतकासह आरसीबीचा विजय



नवी दिल्ली: आरसीबी आणि केकेआर यांच्यात सामना चांगलाच अटीतटीचा झाला. विराट कोहलीच्या उत्कृष्ट शतकी खेळीच्या बळावर आरसीबीने केकेआर विरूद्धचा सामना विकेट्सने जिंकला. या विजयासह आरसीबीच्या संघाचं प्लेऑफमधील स्थान जवळपास निश्चित केलं आहे.चेस मास्टर विराट कोहलीने केकेआरविरूद्ध सामन्यात ५८ चेंडूत १० चौकार व ३ षटकारांसह शतक झळकावलं. विराटचं हे आयपीएल कारकिर्दीतील नववं शतक ठरलं. विराटच्या या शतकी खेळीमुळे केकेआरविरूद्धचा सामना एकतर्फी केला.केकेआरने दिलेल्या १९३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीची सुरूवात चांगली झाली. पण जेकब बेथल १५ धावा करत बाद झाला. त्यानंतर दोन वेळा डकवर बाद झालेल्या विराटने मात्र अर्धशतकी खेळी करत आपल्या फॉर्मची झलक दाखवून दिली. विराट कोहली व देवदत्त पडिक्कल यांनी ५९ चेंडूत ९२ धावांची खेळी केली. देवदत्त पडिक्कल २७ चेंडूत ३९ धावांची खेळी केली. तर कर्णधार रजत पाटीदार ११ धावा करत बाद झाला. टीम डेव्हिड फक्त २ धावा करत माघारी परतला, आपला १९वा सीझन खेळणाऱ्या मनिष पांडेने मैदानावर डाईव्ह मारत अनपेक्षित झेल टिपला. त्याचा हा झेल पाहून सगळेच अवाक् झाले. आरसीबीने नाणेफेक जिंकत केकेआरला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. केकेआरचे दोन्ही सलामीवीर १९ आणि १८ धावा करत बाद झाले. त्यानंतर अंगक्रिश रघुवंशीने संघाचा डाव सावरला. रघुवंशीने ४६ चेंडूत ७ चौकार व ३ षटकारांसह ७१ धावांची खेळी केली. तर कॅमेरून ग्रीनने २४ चेंडूत ३२ धावा केल्या. तर रिंकू सिंहने २९ चेंडूत ३ चौकार व २ षटकारांची ४९ धावांची खेळी केली. यासह केकेआरने २० षटकांत ४ बाद १९२ धावा केल्या आहेत. आरसीबीकडून या सामन्यात भुवनेश्वर कुमार, जोश हेझलवूड व रसिख सलाम दार यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या.



## लाजिरवाण्या पराभवानंतर पाकिस्तान क्रिकेटमध्ये सर्वात मोठा भूकंप!

दिल्ली–पाकिस्तान क्रिकेट संघाला बांगलादेश विरुद्धच्या पहिल्या कसोटीत १०४ धावांनी लाजिरवाणा पराभव पत्करावा लागल्यानंतर संघात मोठी खळबळ उडाली आहे. ढाक्यात झालेल्या या पराभवानंतर आता कर्णधार शान मसूदची गादी धोक्यात आल्याची चर्चा रंगली असून पुन्हा एकदा बाबर आझमकडे कसोटी संघाची धुरा सोपवली जाऊ शकते, अशी माहिती समोर येत आहे.पहिल्या कसोटीत दुखापतीमुळे बाबर आझम खेळू शकला नव्हता, तर शान मसूद दोन्ही डावांत अपयशी ठरला. त्यानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डामध्ये मोठ्या हालचाली सुरू झाल्याचं सांगितलं जात आहे. वृत्तांनुसार, वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या उर्वरित सामन्यांसाठी बाबर आझमला पुन्हा कसोटी कर्णधार बनवण्याचा गंभीर विचार सुरू आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, पीसीबीमधील काही प्रभावशाली अधिकारी बाबरला पुन्हा नेतृत्वाची संधी देण्याच्या बाजूने आहेत. डिसेंबर २०२३ पासून शान मसूदच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानने १५ पैकी तब्बल ११ सामने गमावले आहेत. त्यामुळे संघाच्या कामगिरीवर नाराजी व्यक्त होत असून उरलेल्या ७ कसोटी सामन्यांसाठी नव्या नेतृत्वाची गरज असल्याचं बोर्डाला वाटत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ''जर बाबर दुसऱ्या कसोटीत पुनरागमन करून फलंदाजीत लय मिळवण्यात यशस्वी ठरला, तर तो पुन्हा कर्णधारपदासाठी सर्वात मजबूत दावेदार ठरू शकतो. बोर्डातील अनेकांना त्याच्या पुनरागमनावर कोणतीही हरकत नाही.''दरम्यान, बाबर आझम याने २०१९ ते २०२३ या काळात तिन्ही फॉरमॅटमध्ये पाकिस्तानचे नेतृत्व केले होते. मात्र, भारतात झालेल्या २०२३ वनडे वर्ल्ड कपनंतर त्यांना कर्णधारपद सोडावे लागले. त्यानंतर २०२४ टी२० वर्ल्ड कपसाठी त्यांना पुन्हा कर्णधार बनवण्यात आले होते, पण खराब कामगिरीनंतर त्यांनी पुन्हा पद सोडले.

## इंग्लंड क्रिकेटमध्ये भूकंप, ७ दिग्गजांची टीममधून हकालपट्टी, स्टोक्सने हंटर चालवला!



मुंबई–इंग्लंड क्रिकेट टीमचा ॲशेस २०२६ मध्ये ४–१ ने लाजिरवाणा पराभव झाला, यानंतर टीममधून ७ दिग्गज खेळाडूंना डच्चू देण्यात आला आहे. न्यूझीलंडविरुद्ध लॉर्ड्सवर ४ जूनपासून इंग्लंडची पहिली टेस्ट सुरू होणार आहे, या सीरिजसाठी इंग्लंडने १५ सदस्यीय टीमची घोषणा केली आहे ज्यात ॲशेस खेळलेल्या ७ दिग्गज खेळाडूंना बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. सीरिजची पहिली टेस्ट ४ जूनपासून लॉर्ड्सवर तर दुसरी टेस्ट १७ जूनपासून ओव्हल आणि तिसरी टेस्ट २५ जूनपासून ट्रेन्ट ब्रिजवर होणार आहे.
मार्कस नॉर्थ निवड समितीचे प्रमुख झाल्यानंतर पहिल्यांदाच त्यांनी टीम निवडली आहे. मार्कस नॉर्थ हे आधी डरहम काऊंटीचे डायरेक्टर होते. मार्कस नॉर्थ यांनी त्यांच्या पहिल्याच सिलेक्शनमध्ये आश्चर्यकारक आणि तितकेच धक्कादायक बदल केले आहेत. सगळ्यात मोठा झटका ओपनर झॅक क्राउलीला लागला आहे. बॅझबॉल क्रिकेटचा प्रमुख खेळाडू म्हणून समोर आलेला क्राउली संघर्ष करत आहे. ॲशेसमध्ये त्याने २७.३० च्या सरासरीने रन केले, तर काऊंटी क्रिकेटमध्येही त्याने १० इनिंगमध्ये फक्त ४४ रन केले. क्राउलीऐवजी डरहमच्या एमलिओ गे याला संधी मिळाली आहे. एमलिओने या काऊंटी सिझनमध्ये ९२ च्या सरासरीने ५५२ रन केल्या, ज्यात ३ शतकांचा समावेश आहे. ओली पोप यालाही टीममधून बाहेर करण्यात आले आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यात ओली पोपची कामगिरी खराब झाली यानंतर त्याच्या जागी जेकब बेथलला तिसऱ्या क्रमांकावर खेळवण्यात आलं. जेकब बेथलला पुन्हा एकदा टीममध्ये संधी मिळाली आहे. याशिवाय इंग्लंडने समरसेटचा युवा बॅटर जेम्स रियू यालाही पहिल्यांदाच टीममध्ये घेतले आहे. विकेट कीपर जेमी स्मिथचा बॅकअप म्हणून रियूकडे पाहिले जात आहे.
फास्ट बॉलिंगमध्येही बदल
इंग्लंडच्या बॉलिंगमध्येही बरेच बदल करण्यात आले आहेत. फास्ट बॉलर जोफ्रा आर्चर पहिल्या टेस्टसाठी उपलब्ध नाही. सध्या आयपीएल खेळत असलेला आर्चर हळूहळू स्वत:ला टेस्ट क्रिकेटसाठी तयार करत आहे. तर मार्क वूडही दुखापतीमुळे बाहेर आहे. ब्रायडन कार्सच्या हाताला दुखापत झाल्यामुळे तो आयपीएलमधूनही बाहेर झाला होता आणि अजूनही फिट झालेला नाही.
इंग्लंडच्या फास्ट बॉलिंगची जबाबदारी आता गस ॲटकिन्सन, जॉश टंग आणि ओली रॉबिनसन याच्यावर आहे. रॉबिनसन दोन वर्षांनंतर टेस्ट टीममध्ये कमबॅक करत आहे. फिटनेस समस्यांमुळे तो बराच काळ टीममधून बाहेर होता. याशिवाय टीममध्ये सोनी बेकर आणि मॅथ्यू फिशर हे फास्ट बॉलरही आहेत. स्पिन बॉलिंगची जबाबदारी रेहान अहमद आणि शोएब बशीर यांच्यावर आहे.
इंग्लंडची टीम
बेन स्टोक्स (कर्णधार), रेहान अहमद, गस एटकिनसन, सोनी बेकर, शोएब बशीर, जेकब बेथल, हॅरी ब्रूक, बेन डकेट, मॅथ्यू फिशर, एमिलियो गे, जेम्स रियू, ओली रॉबिनसन, जो रूट, जेमी स्मिथ, जॉश टंग

**तेव्हा ती गोष्ट मनाला लागते** | **कोहलीने सामन्यानंतर केलं मोठं वक्तव्य**

# विराटने विक्रमी शतक मैदानावर सेलिब्रेट का केलं नाही?

नवी दिल्ली: विराट कोहलीने केकेआरविरूद्ध सामन्यात शतक झळकावत आरसीबीच्या विजयाचा सामनावीर ठरला. हा पुरस्कार घेतल्यानंतर विराट काय म्हणाला जाणून घेऊया. किंग कोहलीने आरसीबी आणि केकेआर यांच्यातील सामन्यात आयपीएल इतिहासातील नववं शतक झळकावलं. आयपीएलमध्ये सर्वाधिक शतकांचा विक्रम विराट कोहलीच्या नावे आहे. विराटने अवघ्या ५८ चेंडूत १० चौकार व ३ षटकारांसह शतक साकारलं. चेस मास्टर विराटच्या या खेळीमुळे आरसीबीने केकेआरने दिलेलं १९३ धावांचं लक्ष्य अखेरच्या षटकात सहज पूर्ण केलं. विराट कोहलीला त्याच्या नाबाद १०५ धावांच्या शतकी खेळीसाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.
विराट कोहलीने या सामन्यात ६० चेंडूत ११ चौकार व ३ षटकारांसह १०५ धावांची खेळी केली. गेल्या सलग दोन सामन्यांमध्ये डकवर बाद झालेल्या विराटच्या मोठ्या खेळीची अपेक्षा सर्वांनाच होती. विराट कोहली शतकाच्या जवळ असताना त्याचं शतक कधी पूर्ण होणार याची चाहते आतुरतेने वाट पाहत होते. पण शतकी खेळी केल्यानंतर अनेकदा आक्रमक सेलिब्रेशन करणाऱ्या विराटने या शतकानंतर सेलिब्रेशन केलं नाही. यामागचं कारण त्याने सामन्यानंतर सांगितलं.
विराट कोहली शतकानंतरच्या सेलिब्रेशनबाबत काय म्हणाला?
विराट कोहली आयपीएलमधील विक्रमी नवव्या शतकाबद्दल म्हणाला, खरं सांगायचं तर माझं सेलिब्रेशन फार मोठं नव्हतं, कारण सध्या प्रत्येक गुण किती महत्त्वाचा आहे हे आम्हाला चांगलं माहित आहे. माझ्यासाठी नेहमीच संघाच्या धावसंख्येत योगदान देणं माझ्यासाठी महत्त्वाची गोष्ट असते. मला माहित आहे की मी जितका जास्त वेळ मैदानात टिकेन, तितकी संघाच्या विजयाची शक्यता वाढते. गेल्या दोन सामन्यांत मला मोठी खेळी करता आली नव्हती आणि ते मला आतून खूप खटकत होतं. कारण मला माहित आहे की मी चांगली फलंदाजी करू शकतो आणि चेंडूही व्यवस्थित टायमिंग होत आहे. पण जेव्हा तुम्ही खेळी मोठी करू शकत नाही किंवा संघासाठी अपेक्षित योगदान देऊ शकत नाही, तेव्हा ते



मनाला लागून राहतं.
पुढे किंग कोहली म्हणाला, इतकी वर्षं माझं एकच ध्येय राहिलं आहे, स्वतः मध्ये सातत्याने सुधारणा करत संघासाठी सर्वोत्तम खेळाडू बनणं आणि सामन्यात प्रभाव पाडणं. त्यामुळे शतक झालं किंवा नाही, त्यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे सामना शेवटपर्यंत पूर्ण करणं आणि संघाला दोन महत्त्वाचे गुण मिळवून देणं. त्यातून आम्ही पुन्हा गुणतालिकेत अव्वल स्थ–ानावर पोहोचलो.
विराट कोहलीचा शतकी डंका, कोलकाताविरुद्ध विजयासह आरसीबी प्लेऑफच्या उंबरठ्यावर
दबावाखाली फलंदाजी करण्याबद्दल विराटचं हुशार उत्तर
दडपणाखाली खेळण्याबद्दल विराट म्हणाला, लोक म्हणतात ना, 'दडपण ही एक संधी असते', त्यामागे कारण आहे. दडपण तुम्हाला नम्र ठेवतं, लक्ष केंद्रित राहतं आणि सरावात अधिक मेहनत घ्यायला भाग पाडतं. त्यामुळे तुम्ही कधीही गोष्टी गृहित धरत नाही. मनातली ती धडधड, थोडंसं टेन्शन, हे चांगलं दडपण तुमचा खेळ सुधारायला मदत करतं. त्यामुळे मी नेट्समध्ये आणखी मेहनत घेत होतो. जेव्हा तुम्ही सातत्याने चांगलं खेळता, तेव्हा नकळत तुमची तीव्रता आणि फोकस थोडासा कमी होऊ शकतो. पण दोन सामने मनासारखे गेले नाहीत की पुन्हा ती अस्वस्थता जाणवायला लागते.
क्रिकेट विश्वात पहिल्यांदाच घडलं! इंग्लंडच्या पुरुष संघाला आता महिला खेळाडू देणार फिल्डिंगचे धडे; कोण आहे नवी कोच?
तेच तुम्हाला पुन्हा मेहनत करायला, स्वतःवर अधिक विश्वास ठेवायला आणि खेळात सुधारणा करायला भाग पाडतं. यात खूप ऊर्जा खर्च होते, पण त्यामुळे तुम्ही आणखी एका विशिष्ट पातळीवर पोहोचता आणि हळूहळू स्वतःचा खेळ अधिक चांगला करत जाता. शेवटी मागे वळून पाहिल्यावर अपयश किती महत्त्वाचं होतं हे लक्षात येतं. कारण तेच तुम्हाला पुन्हा त्या जागी आणून उभं करतं जिथून सर्वोत्तम कामगिरी घडते आणि तुमच्यातील तीव्रता कायम ठेवते. म्हणूनच लोक म्हणतात की दडपण ही एक संधी आहे.
ङ्गआणि हो, मी नक्कीच थोडा नर्व्हस होतो. मला फक्त पहिली धाव काढायची होती आणि त्यानंतर थोडा आनंद साजरा करत खेळाचा आनंद घ्यायचा होता,ङ्ग सलग दोनदा डकवर बाद झाल्यानंतर विराटने स्वत:ला पुन्हा कसं सावरत चांगली कामगिरी साकारली याबद्दल त्याने अखेरीस सांगितलं.

# नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते अनावरण

**मुंबई / प्रतिनिधी :** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

---

कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांचा एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.




प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.

यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध आखाड्यांचे साधू, संत उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी यावेळी उपस्थित साधू संतांचे स्वागत केले.

- **हे बोधचिन्ह नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या पवित्र भूगोल आणि धार्मिक परंपरांवर आधारित आहे.**
- **भगवान शंकराचे त्रिशूळ: आध्यात्मिक उर्जेचे प्रतीक.**
- **त्र्यंबकेश्वर मंदिर: प्रादेशिक वारशाचे दर्शन घडवणारी मंदिराची प्रतिकृती.**
- **काळाराम मंदिराची कमान आणि गोदावरी नदी: गोदावरी नदीला 'शिवलिंगा'च्या रूपात दर्शविण्यात आले असून, ते कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित करते.**

**नाशिक – त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाविषयी**

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, 'मायगव्ह' आणि 'असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून या बोधचिन्हाची निवड करण्यात आली. २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मायगव्ह प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३,०६७ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या.

सहभागाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर राहिले, त्याखालोखाल दिल्ली आणि तामिळनाडूचा क्रमांक लागला. १८ ते २४ वयोगटातील तरुणांनी या स्पर्धेत सर्वाधिक सक्रिय सहभाग नोंदवला.

## मळवटी उपकेंद्रा अंतर्गत वीजपुरवठा बंद राहील

**लातूर/प्रतिनिधी :** महावितरणच्या ग्रामीण विभागांतर्गत येणाऱ्या ३३/११ केव्ही उपकेंद्र मळवटी अंतर्गत ११ केव्ही हनमंतवाडी फिडर, कोळपा शाखा व लातूर ग्रामीण उपविभागातील तातडीच्या दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी गुरूवारी, दि.१४ मे रोजी सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेदरम्यान वीजपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.

या कामामुळे हनमंतवाडी पूर्ण गाव, कासराळ पूर्ण गाव, मळवटी अर्धे गाव तसेच बोरेवटी येथील वाणिज्य भागातील वीजपुरवठा प्रभावित राहणार आहे. संबंधित नागरिक व वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच देखभाल व दुरुस्तीची कामे वेळेपूर्वी पूर्ण झाल्यास वीजपुरवठा तत्काळ पूर्ववत करण्यात येईल, अशी माहिती महावितरण कडून देण्यात आली आहे.

## मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी लातूरमध्ये 'एसआयआर' मॅपिंग मोहीम सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार याद्यांचे सखोल पुनरीक्षण (एसआयआर) आणि मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी लातूर जिल्ह्यात विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. सन २००२ च्या मतदार यादीशी सध्याच्या मतदारांचे 'मॅपिंग' (पडताळणी) करणे या मोहिमेचा मुख्य उद्देश असून, ही प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या मतदारांना भविष्यात सुनावणीच्या क्लिष्ट प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम ११ मे २०२६ ते २५ मे २०२६ या कालावधीत राबवली जात आहे. यासाठी सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) आणि पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली असून, ते दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मतदान केंद्रांवर उपलब्ध राहतील. तसेच इतर वेळी ते मतदारांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील. मतदारांनी सन २००२ च्या मतदार यादीतील माहितीनुसार २००२ मधील मतदार संघाचे नाव, मतदार यादी भाग क्रमांक, यादीतील अनुक्रमांक या तीन प्रमुख बाबींची पडताळणी करणे आवश्यक आहे. ज्या मतदारांची नावे २००२ च्या यादीत नाहीत, त्यांची पडताळणी त्यांच्या आई-वडील किंवा आजी-आजोबांच्या नावाच्या आधारे केली जाणार आहे.

लातूरच्या उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी २३५- लातूर शहर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पंचायत समिती सभागृहात आढावा बैठक पार पडली. ज्या भागात मॅपिंगचे काम ७० टक्क्यांहून कमी आहे, त्या ठिकाणच्या बीएलओ आणि स्वच्छता निरीक्षकांना कामकाज तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

भविष्यात सुनावणी आणि पुराव्यांच्या पडताळणीची किचकट प्रक्रिया टाळण्यासाठी मतदारांनी स्वतःहून आपले मतदार ओळखपत्र दाखवून बीएलओ मार्फत ही मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी विशेष पथकांची नियुक्ती

**जळकोट/प्रतिनिधी :** हवामान खात्याने यंदाच्या मान्सून हंगामात एल-निनोच्या प्रभावामुळे सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने संभाव्य पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर जळकोट तालुका प्रशासन सतर्क झाले आहे. उपलब्ध जल साठ्याचा काटकसरीने वापर व्हावा तसेच प्रकल्पांमधील आरक्षित पाण्याचा अवैधरीत्या उपसा होऊ नये यासाठी जळकोट तालुका प्रशासनाने विशेष पथकांची नियुक्ती केली आहे.

जिल्हाधिकारी लातूर यांच्या आदेशानुसार तालुक्यातील विविध प्रकल्प परिसरात सुरू असलेल्या अवैध पाणी उपशावर नियंत्रण आणण्यासाठी मोटारी जप्त करणे, विद्युत पुरवठा खंडित करणे आणि संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी महसूल, पंचायत राज, वीज वितरण कंपनी आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

# मान्सूनपुर्व कामे निर्धारीत वेळेत पुर्ण करावीत मुख्य अभियंत्यांचे निर्देश

**देखभाल दुरूस्ती दरम्यान खंडीत वीजपुरवठयासाठी वीजग्राहकांनी सहकार्य करण्याचे महावितरणचे आवाहन**

**लातूर/प्रतिनिधी :** उन्हाची दाहकता वाढत असतानाच पावसाळ्यामधे वीजग्राहकांना अखंडीत वीजपुरवठा करता यावा या दृष्टिने दरवर्षी महावितरणच्या वतीने मान्सूनपुर्व देखभाल दुरूस्तीची कामे हाती घेतली जातात. यामध्ये विद्युत यंत्रणेला अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटने, रोहीत्रांची देखभाल त्याचबरोबर उपकेंद्रामधील दुरूस्ती आदी कामांचा समावेश असतो. लातूर परिमंडळातील मान्सूनपुर्व कामांना सुरवात झाली असून निर्धारीत वेळेत सर्व कामे पुर्ण करण्याचे निर्देश लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी सर्व विभागीय अभियंत्यांना दिले आहेत.

पावसाळयामध्ये वीजपुरवठा सुरळीत रहावा यासाठी रखरखत्या उन्हातही महावितरणचे कर्मचारी सातत्याने कार्यरत आहेत. परंतु विद्युत यंत्रणांच्या देखभाल व दुरुस्तीचे कामे करण्यासाठी त्या-त्या भागातील वीजपुरवठा खंडित करावाच लागतो, सर्व भागाचा वीज पुरवठा खंडित न करता टप्प्या टप्प्याने कामे करून तेवढाच भाग खंडित करून त्या भागातील दुरुस्ती कामे केली जातात.

ही कामे पावसाळ्यामध्ये ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित होऊन जास्त वेळ बंद राहू नये म्हणून वीज वाहिनीला स्पर्श करत असलेल्या झाडाच्या फांद्या छाटने, फुटलेले पीन इंसुलेटर तपासणे व बदलणे, रोहीत्रांची ऑईल पातळी तपासणी, ऑइल गळती थांबवणे, वीजवाहिनींचे खराब झालेले लाईटनिंग अरेस्टर बदली करणे, वीजहवाहिन्यांचे खराब झालेले जंपर बदली करणे, जीर्ण झालेल्या वायर बदलणे, उपकेंद्रातील सर्व यांत्रिक बाबीची व यंत्रणा यांची तपासणी करणे व त्याची दुरुस्ती करणे. तसेच प्रत्यक्ष वेळेवर आढळणाऱ्या त्रुटी दुर करणे, अशा प्रकारची अनेक कामे केली जातात.

मात्र सदर कामे करीत असताना नाईलाजास्तव काही काळासाठी वीजपुरवठा खंडित करावा लागतो. दुरूस्तीची कामे केल्यानंतर सुद्धा अनेक वेळा जोरदार वादळी वारा व पावसामुळे झाडे, फांद्या पडून वीज वाहिनी तुटने, वीज तारांवरील डिस्क इंसुलेटर फुटने अशा घटना घडत असतात त्यामुळे महावितरणची यंत्रणा पूर्ववत व सुरळीत करण्यासाठी कामे करावी लागतात. मात्र अगोदर प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यामुळे गतीने वीज पुरवठा सुरळीत करण्यास मदत होते. वाढत्या तापमानामूळे ग्राहकांना विजेअभावी होणाऱ्या त्रासाची महावितरणला जाणीव आहेच. मात्र देखभाल दुरुस्तीची कामे वीज यंत्रणेच्या हिताची तसेच अखंडित, सुरळीत व सुरक्षित ग्राहक सेवेसाठी असून ग्राहकांनी वीजपुरवठा बंद असलेल्या काळात थोडासा संयम राखून महावितरणला सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.



# टेबल टेनिस हॉल'चे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या शुभहस्ते उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्थेच्या क्रीडा संकुलात नव्याने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक 'टेबल टेनिस हॉल'चे उद्घाटन लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड (आय.ए.एस.) यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. दयानंद परिसरातील मुलींच्या वसतिगृहासमोर उभारण्यात आलेल्या या आधुनिक हॉलच्या उद्घाटन प्रसंगी दयानंद संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी हे उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मान्यवरांच्या हस्ते फीत कापून टेबल-टेनिस हॉलचे उद्घाटन करण्यात आले.

मुख्य समारंभात बोलताना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड म्हणाले, मी स्वतः दयानंद विधी महाविद्यालयाचा विद्यार्थी असून माझ्या शैक्षणिक जीवनातील शेवटच्या वर्षाचा टी.सी. याच महाविद्यालयात आहे. दयानंद शिक्षण संस्थेने खेळाडूंसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. अशा अद्ययावत सोयी-सुविधांमुळे लातूरचे खेळाडू भविष्यात ऑलम्पिकमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करतील, असा मला विश्वास वाटतो. ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून खेळाची आवड निर्माण झाल्यास 'हॅप्पी हार्मोन्स'चा विकास वेगाने होतो. त्यामुळे मुलांच्या मानसिक, सामाजिक आणि शारीरिक विकासासाठी टेबल टेनिससारखे खेळ अत्यंत महत्त्वाचे आहेत. शिक्षणासोबत खेळालाही समान महत्त्व देण्याची संस्थेची भूमिका कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. आंतरराष्ट्रीय खेळाडू श्री. संजय आयाचित यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, कोणताही खेळ खेळण्यासाठी वयाचे बंधन नसते. टेबल टेनिस हा जगातील सर्वात वेगवान खेळ असून विद्यार्थ्यांमध्ये लक्ष केंद्रित करण्याची व बौध्दिक क्षमता वाढविण्यासाठी हा खेळ अत्यंत उपयुक्त आहे. परीक्षेच्या काळातही हा खेळ मानसिक एकाग्रता वाढविण्यास मदत करतो. सरावासाठी संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या अत्याधुनिक सुविधांचे त्यांनी विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून खेळण्याची आवड निर्माण झाली तर महाविद्यालयीन जीवना



खेळाविषयी गोडी निर्माण होते.

अध्यक्षीय समारोपात संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी यांनी संस्थेच्या वतीने खेळाडूंना सर्वो तोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले की, १९६२ मध्ये शेतकरी व व्यापारी यांच्या सहकार्याने कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांपासून संस्थेची सुरुवात झाली. सुरुवातीला २५० विद्यार्थ्यांपासून सुरू झालेली ही संस्था आज १६ हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली असून संस्थेत सुमारे १९५० कर्मचारी कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून संस्थेत विविध २२ क्रीडा प्रकार संस्थेत राबविले जातात. आज टेबल टेनिस हॉलसाठी सुमारे ३० लाख रुपयांचा खर्च केला आहे. यातून भविष्यात नक्कीच आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू येथे तयार होतील असा मला विश्वास आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा समितीचे अध्यक्ष ॲड. आशिष बाजपाई यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, शारीरिक आणि संगणकीय या तीन महत्त्वपूर्ण क्षमतांच्या विकासासाठी संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले. मनात जिद्द असेल तर ८० वर्षांपर्यंत शारीरिक क्षमता सुदृढ ठेवता येते. लातूर पॅटर्नचे जनक असलेल्या या संस्थेने आधुनिक शिक्षणासोबत क्रीडा विकासालाही प्राधान्य दिल्याचे त्यांनी नमूद केले.

या सोहळ्याला संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी, संयुक्त सचिव श्री. विशाल लाहोटी, सहायक सचिव श्री. अजिंक्य सोनवणे, श्री. बालकिशन बांगड, श्री. उमाकांत केराळे, श्री. सागर मंत्री, श्री. अशोक पाटील, डॉ. सुरेश भट्टड, श्री.शांतीलाल कुचेरिया, श्री. शशिकांत कोटलवार, श्री. चैतन्य भार्गव यांच्यासह संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी, क्रीडा मार्गदर्शक अभिषेक बाजपाई यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. मान्यवरांच्या हस्ते खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला. या सोहळ्यास सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, क्रीडा संचालक, विभागप्रमुख,शहरातील नागरिक, क्रीडाप्रेमी, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. रवींद्र व्होरा यांनी मानले तर सूत्रसंचलन डॉ. मेघा पंडित यांनी केले. या उद्घाटन कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले होते.

# मनपाच्या परवानगीशिवाय बॅनर लावणे व छापण्यासही बंदी

**लातूर/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय शहरात पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग व कमानी लावू नयेत अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असा इशारा महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे यांनी दिला.



महापौरांच्या अध्यक्षतेखाली शहरात शहरातील डिजिटल बॅनर्सचे प्रिंटर्स व बॅनर लावणाऱ्या एजन्सीचे प्रतिनिधी यांची बैठक बुधवारी (दि. १३) संपन्न झाली. आयुक्त श्रीमती मानसी,उपमहापौर स्नेहल उटगे, सभागृह नेते विजयकुमार साबदे, उपायुक्त वसुधा फड व शहरातील तीनही प्रमुख पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांची या बैठकीस उपस्थिती होती.

या बैठकीत बोलताना महापौर श्रीमती सोनकांबळे म्हणाल्या की, न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्रमांक झखङ छज - १५५/२०११ वरील आदेश दि. ३१ जानेवारी २०१७ चे पालन करणे सर्वांसाठी बंधनकारक आहे. महाराष्ट्र मालमत्ता विरूप्पन प्रतिबंध कायदा १९९५ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये शहरांमध्ये अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग व कमानी लावणाऱ्यांच्या विरोधात कायदेशीर कार्यवाही करण्याची तरतूद आहे. या अनुषंगाने शहरातील सर्व प्रिंटर्सनी बॅनर्सची छपाई करताना त्यावर मनपाकडून घेतलेल्या परवानगीचा क्रमांक, परवाना कालावधी, ज्या ठिकाणी बॅनर्स लावावयाचे आहेत त्या ठिकाणाचे नाव,प्रिंटर्सचे नाव व प्रकाशकाचे नाव छापणे बंधनकारक आहे.प्रिंटर्सनी मनपाच्या परवानगीशिवाय बॅनरची छपाई करू नये.विनापरवाना बॅनर्स लावणाऱ्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल. बॅनर्स लावणाऱ्या एजन्सीने विजेचे खांब,झाडे, दुभाजक यावर बॅनर्स लावू नयेत, अशा सूचनाही महापौरांनी केल्या.

क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रामध्ये अनधिकृत बॅनर लागणार नाहीत याची दक्षता घ्यावी, असे आदेशही महापौरांनी दिले.

शहरात महानगरपालिकेच्या ३८ व खाजगी ९४ जागा बॅनर्स लावण्यासाठी मनपाने निश्चित केल्या आहेत. त्या ठिकाणीच बॅनर्स लावावे, असेही त्या म्हणाल्या.

शहरातील नागरिकांनी अनधिकृत जाहिराती, घोषणाफलक,होर्डिंग व पोस्टर्स या संदर्भात तक्रार असल्यास मनपाच्या १८००२३३१३८८ या टोल फ्री क्रमांकावर कार्यालयीन वेळेत नोंदवावी.या तक्रारींची तात्काळ दखल घेतली जाईल. मनपाच्या वतीने देण्यात आलेल्या सूचनांचे फलक प्रिंटिंग प्रेस आस्थापनेच्या बाहेर लावणे बंधनकारक असल्याचेही महापौर श्रीमती सोनकांबळे यांनी या बैठकीत सांगितले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# राज्यस्तरीय लेखनी मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित कवयित्री जना घूले यांच्या स्वरचित अनोळखी कवितेचे उत्कृष्ट सादरीकरण



**लातूर/प्रतिनिधी:** नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य आणि भारतीय सारस्वत मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय लेखनी मराठी साहित्य संमेलन नुकतेच कोल्हापूर येथील विद्याभवन,विक्रम हायस्कूल बसस्टँड समोर कोल्हापूर येथे पार पडले.या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी अशोक भोईटे हे होते तर परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. चंद्रशेखर हळिंगले यांची उपस्थिती होती. तर स्वागताध्यक्ष म्हणून सुरेश सरकटे आणि प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा मनीषा डांगे, अभिनेत्री आदिती शारंगधर, खंडेराव जगदाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या राज्यस्तरीय लेखनी मराठी साहित्य संमेलनामध्ये निमंत्रित कवयित्री म्हणून लातूर तालुक्यातील केंद्रीय प्राथमिक शाळा नांदगाव येथील प्राथमिक शिक्षिका तथा कवयित्री श्रीमती जना घूले (नागरगोजे) यांनी अनोळखी या स्वरचित कवितेचे उत्कृष्ट सादरीकरण केले.त्यांच्या संमेलनातील या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल कार्यक्रमाच्या प्रमूख पाहुण्यां तथा अभिनेत्री आदिती शारंगधर यांच्या शुभहस्ते जना घूले ( नागरगोजे) यांचा सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी संमेलनाचे आयोजक तसेच महाराष्ट्रभरातील विविध

जिल्ह्यांतून आलेले कवी उपस्थित होते. त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

# चाकूरच्या संजय गांधी निराधार समिती अध्यक्षपदी सिद्धेश्वर अंकलकोटे



**चाकूर/प्रतिनिधी:** : राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या शिफारसीनुसार लातूर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी चाकूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती जाहीर केली असून त्या समितीचे चाकूर तालुक्याचे अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते सिद्धेश्वर अंकलकोटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच या समितीत सदस्य म्हणून रामेश्वर कसबे, संगीता तात्यासाहेब जाधव, विवेकानंद लवटे पाटील, पांडुरंग धडे, खुदबोद्दिन घोरवाडे, दत्तासाहेब पाटील, श्रीनाथ सावंत ,संतोष माने, केरबा शेळके यांचा समावेश करण्यात आला आहे. या समितीत शासकीय सदस्य म्हणून गटविकास अधिकारी , मुख्याधिकारी नगरपंचायत चाकूर हे आहेत. तर या समितीचे सचिव म्हणून तहसीलदार चाकूर हे असणार आहेत.

संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीत अध्यक्ष व सर्व सदस्यांचे राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील, तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, नगराध्यक्ष करीम गुळवे चाकूर पंचायत समितीचे सभापती जयश्री मच्छिंद्र नागरगोजे, उपसभापती भुजंग शिंदे, सर्व जी प सदस्य, प.स . सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुक्यातील विविध पदाधिकारी कार्यकर्ते आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# राज्यातील ९९ टक्के वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज नाही

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या सरसकट सर्व वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज हा अधिभार द्यावा लागणार असल्याचे चित्र काही हितसंबंधी गटांकडून निर्माण केले जात असून ते पूर्णपणे चुकीचे आहे. राज्यामध्ये महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे एकूण ग्राहकांपैकी एक टक्क्यापेक्षा कमी अर्थात केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार लागू झाला आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

ज्या ग्राहकांचा मंजूर भार १० किलोवॅटपेक्षा अधिक आहे व ज्यांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविला आहे त्यांना त्यांनी निर्माण केलेल्या विजेवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा, असा आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिला आहे. त्यानुसार महावितरणने संबंधित वीज ग्राहकांना हा अधिभार लागू केला आहे.

राज्यात महावितरणचे २ कोटी ३७ लाख घरगुती वीज ग्राहक आहेत. त्यापैकी ६ लाख ५७ हजार घरगुती वीज ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले आहेत. आयोगाच्या आदेशानुसार सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या एकूण घरगुती ग्राहकांपैकी १६,४१० म्हणजे केवळ २.४९ टक्के घरगुती ग्राहकांनाच ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. सर्व २ कोटी ३७ लाख ग्राहकांशी तुलना केली तर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेल्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण केवळ ०.०७ टक्के आहे.

राज्यात एकूण ४ लाख ४५ हजार औद्योगिक (उच्चदाब व लघुदाब) वीज ग्राहक असून त्यापैकी केवळ ८,८९४ ग्राहकांना म्हणजे सुमारे २ टक्के ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेला आहे. त्याचप्रमाणे महावितरणच्या एकूण २३ लाख ३० हजार व्यावसायिक वीजग्राहकांपैकी १२,८३२ ग्राहकांना म्हणजे ०.५५ टक्के व्यावसायिक ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने २०१९ साली छतावरील सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या वीजग्राहकांवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करण्याचा निर्णय दिला होता. त्यावेळी आयोगाने छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्पांची राज्यातील एकूण क्षमता २ हजार मेगावॅट झाल्यावर हा चार्ज लागू करण्याचा आदेश दिला होता. आयोगाने २०२३ मध्ये ही मर्यादा ५ हजार मेगावॅट केली. या वर्षाच्या सुरुवातीला राज्याने ५ हजार मेगावॅटची क्षमता ओलांडल्यानंतर आयोगाने २५ मार्च २०२६ च्या वीजदर आदेशात ग्रीड सपोर्ट चार्ज निश्चित केला.

सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या ग्राहकांना १२९ कोटींचा लाभ - छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेले जे ग्राहक अतिरिक्त वीज महावितरणला देतात त्यांना त्याबद्दल लाभ मिळतो. राज्यातील ४ लाख ९० हजार वीजग्राहकांना या प्रकारे गेल्या वर्षभरात १२९ कोटी ५७ लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे. त्यामध्ये ४ लाख ७२ हजार घरगुती ग्राहकांचा समावेश आहे व त्यांना १२४ कोटी ५५ लाख रुपयांचा लाभ झाला आहे.

# महापारेषण आणि व्यक्ती विकास केंद्र यांच्यात सामंजस्य करार

## अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी तणावमुक्ती, नेतृत्व व व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) आणि व्यक्ती विकास केंद्र (आर्ट ऑफ लिव्हिंग) यांच्यात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या कराराअंतर्गत महापारेषणच्या गट-अ, ब आणि क मधील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे राज्य संचालक श्री. अविनाश पुरुशे यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. याप्रसंगी मुख्य विधी सल्लागार श्री. विजय पाटील, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, उपमहाव्यवस्थापक श्री. नितीन कांबळे, अधीक्षक अभियंता श्री. संजीवकुमार बद्देला, श्रीमती मनिषा शहा, श्री. चंद्रकांत ठाकूर उपस्थित होते.



या उपक्रमांतर्गत मानसिक, शारीरिक व भावनिक आरोग्य सुधारणा, तणाव व्यवस्थापन, नेतृत्व विकास, कार्यक्षमता वाढ, सकारात्मक कार्यसंस्कृती निर्माण करणे तसेच नैतिक मूल्यांची जपणूक यावर भर दिला जाणार आहे. प्रशिक्षणामध्ये योग, प्राणायाम, ध्यान, सुदर्शन क्रिया, संवाद कौशल्य, टीम बिल्डिंग, निर्णयक्षमता, भावनिक संतुलन आणि व्यक्तिमत्त्व विकास यांसारख्या विषयांचा समावेश असेल.

हा करार एक वर्षासाठी लागू राहणार असून दरवर्षी किमान १२ प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. हे कार्यक्रम निवासी, अनिवासी तसेच ऑनलाईन स्वरूपात आयोजित करण्यात येतील. प्रशिक्षणासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगचे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, कार्यक्षम नेतृत्व आणि तणावमुक्त कार्यसंस्कृती विकसित करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

# उदगीर, जळकोटच्या अतिवृष्टीग्रस्तांना तातडीने मदत द्या: संजय बनसोडे यांची मागणी

**उदगीर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर मंत्रालयात राज्याचे कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसान, जमीन खरडून झालेली हानी तसेच शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत अतिवृष्टीने नुकसान झालेल्या जिल्ह्याचा आढावा घेण्यात आला. गतवर्षी खरीप २०२५ च्या हंगामात उदगीर-जळकोट मतदारसंघातील जवळपास ८५ ते ९० टक्के पीक क्षेत्र नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाले आहे. उदगीर तालुक्यात ६१ हजार ८४५ हेक्टर तर जळकोट तालुक्यात ३० हजार ८६७ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली होती. एकूण ९२ हजार ७१२ हेक्टर क्षेत्रापैकी तब्बल ७७ हजार ८६५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून सुमारे ६८९८.३६ लाख रुपयांच्या नुकसान भरपाईचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना पीक विमा व नुकसान भरपाई तातडीने मिळावी यासाठी बैठकीत विविध महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या. एनडीआरएफ पंचनाम्यांची माहिती ग्राह्य धरून सर्व पीक विमाधारक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा मंजूर करावा, अतिवृष्टीमुळे पिकांच्या गुणवत्तेत झालेल्या घटीचाही विमा योजनेत समावेश करावा तसेच ई-पीक पाहणीतील तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठी तातडीची दुरुस्ती व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या.

याशिवाय गाव पातळीवर पंचनामे करण्याची व्यवस्था, विमा कंपन्यांवर कडक नियंत्रण ठेवणे, शेतकऱ्यांना व्याजासह भरपाई देण्याची तरतूद करणे तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांचा विमा हप्ता शासनाने उचलावा, अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

विमा कंपनीने अपिल केले होते ते दोन्ही स्तरावर फेटाळण्यात आले आहेत. त्याप्रमाणे विमा कंपनीने मान्यता दिली असुन आता विमा कंपनी विमा भरपाई देण्याची कार्यवाही तातडीने करणार असल्याचे विमा कंपनीचे प्रतिनिधी चंदन जगताप यांनी बैठकीत सांगितले. या बैठकीस कृषि सचिव परिमल सिंह, कृषि आयुक्त सुरज मांढरे, बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार आदी उपस्थित होते. शेतकरी अडचणीत नुकसान भरपाई द्यावी माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी, लातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील शेतकरी नैसर्गिक संकटामुळे मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाने शेतकऱ्यांना न्याय देवुन तातडीने आणि जास्तीत जास्त नुकसान भरपाई द्यावी अशी भूमिका त्यांनी मांडली, शेतकऱ्यांच्या हितासाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची मागणी ही आ.बनसोडे यांनी केली आहे.






## रूजवात ..

भल्याकार्यां चांगली
स्वतांपासून सुरवात
आपल्या अंतर्मनात
दृश्य व्हावी रुजवात

आवाहन काळजात
मदती ये सहस्त्रहात
कुणी काळजी ग्रस्त
आपसूक मिळे साथ

वेळ लागतो बदलांस
काही नघडे रातोरात
प्रज्वलित होई ज्योत
उजळूनि पहावी वात

शुध्दता जर विचारात
मिसळे सारे प्रवाहात
शांतवी टिका वादळा
आल्हादक होतो वात

पटवून द्यायचेगांभीर्य
परिस्थितीला अ ज्ञात
काफिल्या सामील हो
पाय कैक ज्ञातअज्ञात

सुयशदडले विश्वासात
आपत्तीचा हो निःपात
किंतुपरंतु नको अहेतू
प्रयास हो निःपक्षपात

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# लातूर तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीवर महसूल विभागाची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांवर महसूल विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. मे महिन्यात राबविलेल्या विशेष मोहिमेत बेकायदेशीररीत्या वाळू, दगड आणि मुरूम यांची वाहतूक करणारी एकूण ४ वाहने जप्त करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती लातूरचे तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सौदागर तांदळे यांनी दिली आहे.

या मोहिमेदरम्यान एकूण ३ हायवा आणि १ टिप्पर या वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. यापैकी एच-२४ बीडब्ल्यू-७७७३ या हायवा वाहनातून ४ ब्रास वाळूची अवैध वाहतूक केली जात होती. याप्रकरणी संबंधिताकडून ३ लाख १५ हजार ६२० रुपये इतका दंड शासन खाती जमा करण्यात आला आहे. तसेच एमएच-४२ टी-०७७५ या हायवा वाहनातून ५ ब्रास मुरूम नेला जात असताना कारवाई करण्यात असून याप्रकरणी २ लाख २९ हजार ७७५ रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.



एमएच-२२ एन-१२५१ या टिप्परवर ३ ब्रास दगडाच्या अवैध वाहतुकीसाठी कारवाई करण्यात आली असून, सध्या या दंडात्मक वसुलीची प्रक्रिया सुरू आहे. तसेच केए-२८ सी- ७३६७ या हायवा वाहनावर ४ ब्रास वाळूच्या वाहतुकीसाठी कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणातील कायदेशीर कार्यवाही देखील प्रगतीपथावर आहे. यापुढेही तालुक्यातील अशा अवैध प्रकारांवर महसूल विभागामार्फत कारवाई केली जाणार आहे, असे तहसील कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

# नीट पेपरफुटी प्रकरणी अभाविप आक्रमक

**लातूर/प्रतिनिधी:** नीट परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अभाविप लातूर शाखेच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला आणि संबंधित दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

तसेच प्रशासन आणि एनटीए यांनी विद्यार्थ्यांना ठोस आश्वासन द्यावे की भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडणार नाहीत. २०२६ मधील नीट युजी परीक्षेत समोर आलेले पेपरफुटीचे प्रकरण धक्कादायक असून, २०२४ मध्येही अशाच प्रकारचा प्रकार उघडकीस आला होता. त्यामुळे शिक्षणव्यवस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते, अशी टीका त्यांनी केली. अभाविपच्या कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी पारदर्शक आणि सुरक्षित परीक्षा प्रणाली राबविण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

**या प्रसंगी बोलताना ऋतुजा अट्टल (विद्यार्थी कार्यक्रता) यांनी सांगितले की, नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याची घटना अत्यंत दुर्दैवी असून ही विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याशी आणि त्यांच्या भविष्याशी खेळ करणारी आहे. दरवर्षी सुमारे २० ते २२ लाख विद्यार्थी ही परीक्षा देतात. अशा महत्त्वाच्या परीक्षांमध्ये गैरप्रकार होत असतील, तर विद्यार्थ्यांचा प्रशासन, शिक्षणप्रणाली आणि परीक्षांवरील विश्वास ढासळण्याची भीती आहे, असे त्यांनी नमूद केले.**

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६